७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




## ढिंग-टांग

प्रत्येक चॅनलवर क्रिकेट विश्लेषकांचा पुर




## ब्रेकिंग न्यूज

### वर्दळीच्या ठिकाणी युवकाचा खून

पुणे (दै. संध्या) : चाकण शहरातील अत्यंत गजबजलेल्या ठिकाणी मच्छीमार्केटच्या समोरील गल्लीत राजगुरुनगर येथील एका युवकाचा खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना शनिवारी (दि. १४) दुपारी घडली. किरकोळ वादातून हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. प्रथमेश माने (रा. राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. या घटनेची माहिती मिळताच, चाकण उत्तर पोलिस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, चाकण पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. संबंधित युवकाचा मृतदेह ताब्यात घेतला असून, उत्तरीय तपासासाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. खुनाचे खरे कारण रात्री उशिरापर्यंत समजले नसून, या घटनेचा चाकण उत्तर पोलिसांनी कसून तपास सुरू केला आहे. गेल्या आठवड्यात बिरदवडी (ता.खेड) येथे अनैतिक संबंधातून तरुणाचा खून झाल्याचा प्रकारही उघडकीस आला होता.


### आंदोलकांची ३ खटल्यातून निर्दोष मुक्तता

पुणे (दै. संध्या) : २०१२ च्या ऊस आंदोलन प्रकरणी इंदापूर न्यायालयात दाखल असणाऱ्या ८ पैकी ३ खटल्यातून राजू शेट्टी,सदाभाऊ खोत, सतीश काकडे, निलेश देवकर यांच्यासह २१ आंदोलकांची (दि. १६) निर्दोष मुक्तता करण्यात आली. २ हजार ७०० रुपयांची पहिली उचल दिली जावी अशी मागणी करुन २०१२ साली शेतकरी संघटनांनी ऊस आंदोलन सुरु केले होते. राज्यातील कोणत्या ही साखर कारखानदाराने तोपर्यंत दर जाहीर केले नव्हते. तात्कालिन सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी पदाची जबाबदारी स्वीकारुन तोडगा काढावा म्हणून कर्मयोगी साखर कारखान्यावर धरणे आंदोलन करण्यात आले होते. सोलापूर- पुणे रास्ता रोको झाल्यानंतर आंदोलनाची तीव्रता वाढली.

■ राज्य सरकारने थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा मागवला ■

# कर्जमाफीबाबत मोठ्या घोषणेची शक्यता

मुंबई (दै. संध्या)





राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

जून 2025 पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे 74 हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे.

नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून 30 जून 2025 ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे राज्यातील खऱ्या अर्थाने थकीत असलेल्या शेतकऱ्यांची स्पष्ट यादी तयार करणे हा आहे. शासनाच्या पोर्टलवर माहिती अपलोड झाल्यानंतर पुढील निर्णय घेणे सोपे जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास अचूक आकडेवारी महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे बँकांकडून माहिती संकलन आणि पडताळणी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे.

दरम्यान, राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन 23 फेब्रुवारी 2026 पासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन 25 मार्च 2026 पर्यंत चालणार असून 6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याच्या विधिमंडळाचे हे महत्त्वाचे अधिवेशन मुंबईत पार पडणार आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा विषय अधिकच चर्चेत आला आहे. शेतकरी वर्गाचे लक्ष आता अर्थसंकल्पाकडे लागले आहे.


यंदाच्या अधिवेशनात एक वेगळी बाब घडणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यावेळी अर्थसंकल्प सादर करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर असणार आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली.

### शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा वाढल्या

कर्जमाफीच्या दृष्टीने सरकारकडून सुरू असलेली माहिती संकलनाची मोहीम आणि आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन यामुळे शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा वाढल्या आहेत. 74 हजार शेतकऱ्यांची माहिती आधीच पोर्टलवर अपलोड झाली असून उर्वरित माहिती लवकरच पूर्ण होणार असल्याचे संकेत आहेत. या पार्श्वभूमीवर 6 मार्च रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कोणती गोड बातमी जाहीर होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## टिपू सुलतान धर्मांध, त्या उपमहापौरांचं पद रद्द करा : प्रकाश महाजन

नाशिक (दै. संध्या)



राज्यात गेल्या दोन दिवसांपासून टिपू सुलतान प्रकरणावरुन राजकीय वातावरण तापलं आहे. मालेगाव महानगरपालिकेमध्ये नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांनी पदभार स्वीकारताच राजकीय वातावरण तापले आहे. महापौरपदी ‘इस्लाम’ पक्षाच्या नसीरिन बानो खालीद शेख, तर उपमहापौरपदी समाजवादी पार्टीचे शान-ए-हिंद यांची निवड झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतान यांच्या छायाचित्रामुळे मोठा वाद निर्माण झाला. त्यातच, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानी तुलना शिवाजी महाराजांशी करत, ते इंग्रजांविरुद्ध लढल्याची माहिती दिली. त्यावरुन, सत्ताधारी भाजपमधील नेत्यांनी त्यांना लक्ष्य केलं. आता, शिवसेना प्रवक्ते प्रकाश महाजन यांनीही हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका केलीय.

## अजित पवारांच्या मनात काय होते, कोणीही सांगू शकत नाही

मुंबई (दै. संध्या)

■ त्यांच्या निधनाने समीकरणे बदलली; अमोल कोल्हेंची सावध भूमिका



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात अनेक चर्चांना उधाण आले आहे. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाचा. अजित पवार यांनी निधनापूर्वी दोन्ही गटांना एकत्र आणण्यासाठी चर्चा सुरू केली होती, तसेच त्या संदर्भात काही बैठका झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे त्यांच्या जाण्यानंतर या प्रक्रियेचे काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या या घडामोडींवर विविध नेते आपापली मते मांडत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि प्रदेशाध्यक्षही या संदर्भात आपला अनुभव सांगत आहेत. मात्र अजित पवार यांच्या गटातील काही नेते विलिनीकरणाबाबत फारसे आग्रही नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पक्षातील अंतर्गत भूमिकांमध्ये भिन्नता असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

याच मुद्द्यावर खासदार अमोल कोल्हे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यांनी सांगितले की राष्ट्रवादीच्या अधिकृत मासिकातही विलिनीकरणासंदर्भातील चर्चा छापून आली होती. अजित दादांचे नेतृत्व स्वीकारण्याबाबत सर्वांचे एकमत झाले होते, ही वस्तुस्थिती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नेतृत्वावर एकवाक्यता होती, असे ते म्हणाले. मात्र त्यानंतरच्या राजकीय घडामोडी आणि दादांच्या निधनामुळे परिस्थिती पूर्णपणे बदलल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विलिनीकरणाच्या मुद्द्यावर सातत्याने प्रतिप्रश्न उपस्थित केला आहे. कोणत्या राष्ट्रवादीचे कोणत्या राष्ट्रवादीत विलिनीकरण होणार? असा थेट सवाल त्यांनी केला होता. तसेच शरद पवार यांच्या गटाची राष्ट्रवादी सत्तेत सहभागी होणार का, हा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे विलिनीकरणासोबतच सत्तास्थापनेबाबतची शक्यता देखील चर्चेत आली आहे.

# वडिलांवरील टीकेनंतर लेक उतरली मैदानात

### हर्षवर्धन सपकाळांच्या लेकीने टीकांकरांना दिले सडेतोड उत्तर, काय म्हणाल्या गार्गी सपकाळ?


मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्रात सध्या नवा वाद सुरू झाला आहे. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी करत वादग्रस्त विधान केले होते. टिपू सुलतानला छत्रपती शिवरायांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे असे त्यांनी म्हटले होते. यावरून भाजपने त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. त्यात आता वडिलांवर होणारी टीका सहन न झाल्याने सपकाळ यांची मुलगी गार्गी सपकाळ आता मैदानात या मैदानात उतरल्या आहेत. माझ्या वडिलांचे मूळ वक्तव्य अतिशय स्पष्ट आणि संदर्भासह होतं. “शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन टिपू सुलतान यांनी कार्य केलं. महाराजांप्रमाणेच त्यांनी कुठल्याही विखारी, विषारी विचारांना थारा दिला नाही, हा त्या वक्तव्याचा आशय होता, असे गार्गी यांनी म्हटले. गार्गी सपकाळ म्हणाल्या, माझ्या वडिलांच्या, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विधानावरुन सध्या राज्यात जाणीवपूर्वक गदारोळ उभा केला जात आहे. हा वाद छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानासाठी नाही, तर त्यांच्या नावाचा राजकीय गैरवापर करून विरोधकांना बदनाम करण्याचा हा एक सुनियोजित प्रयत्न आहे. ज्यांनी सातत्याने महाराजांच्या विचारांना आणि इतिहासाला विकृत करण्याचं काम केलं आहे, तेच आज अचानक अपमान झाल्याचं ढोंग करत आहेत, हीच या संपूर्ण गदारोळामागची खरी राजकीय चाल असल्याचा आरोप गार्गी यांनी केला आहे. गार्गी सपकाळ म्हणाले, विविध जाती आणि धर्मांमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तेढीच्या पार्श्वभूमीवर काही संघटनांनी अशी मागणी केली होती की सर्व शासकीय कार्यालयांमध्ये महामानवांचे फोटो लावावेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांसोबत टिपू सुलतान यांचेही फोटो असावेत. 'या मागणीकडे आपण कसं पाहता?' असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाच्या उत्तरात, वरील संदर्भात हे वक्तव्य करण्यात आलं.

पण आज त्याच वक्तव्याचा हेतुपुरस्सर विपर्यास केला जात आहे. पुढे गार्गी सपकाळ म्हणाल्या, यांच्याच लाडक्या भगतसिंग कोश्यारी यांनी 'शिवाजी महाराज आता जुने झाले, नवे आयडॉल नितीन गडकरी' अशी अपमानास्पद तुलना केली, फुले दाम्पत्याचा अपमान केला, तेव्हा या सत्ताधाऱ्यांच्या तोंडातून एक शब्दही निघाला नाही.

उलट अशा व्यक्तीला महाराष्ट्रभूषण देऊन त्यांनी महाराजांप्रती आपली खरी मानसिकता उघडी पाडली. कोरटकर या मा. फडणवीसांच्या जवळच्या व्यक्तीकडून महाराजांचा अपमान होतो, तेव्हा हे गप्प बसतात.




# अजितदादांचे पायलट कुठे ट्रॅफिकमध्ये अडकले?: घरातून कधी निघाले?

### त्या दिवशीचा दिनक्रम संपूर्ण महाराष्ट्राला कळू द्या - अमोल मिटकरी

पुणे (दै. संध्या)

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांचे विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. त्यांचा अपघात होता की घातपात यावरून अनेकांनी शंका उपस्थित केल्या आहेत. यात राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. ब्लॅक बॉक्सचे सत्य समोर येईलच, पण त्याचवेळी दादांच्या विमानाचे दोन पायलट कुठे ट्रॅफिकमध्ये अडकले होते, ते घरातून कधी निघाले होते याचा सीसीटीव्ही महाराष्ट्राच्या समोर आणा, अशी मागणी मिटकरींनी केली आहे.

अमोल मिटकरी यांनी ट्विट करत म्हटले, ब्लॅक बॉक्स जळालेला असल्याने डेटा रिकव्हर करायला अडचण! आता ब्लॅक बॉक्स विदेशात रिकव्हर होणार व 'लवकरच' विमान अपघाताची माहिती मिळणार असे आम्ही समजतो. वाट पाहू पण तोवर विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज, पायलट साहिल मदन, पायलट यश, पायलट सुमित कपूर व शांभवी पाठक हे घरून किती वाजता व कुण्या गाडीत निघाले, कुण्या रोडवर ट्रॅफिकमध्ये अडकले, त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज व सर्व या पायलटचा 28 जानेवारी 2026 चा दिनांक व दिनक्रम महाराष्ट्राला कळू द्यावा ही विनंती, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार व अजित पवारांचे पुतणे रोहित पवार यांनी देखील अजित पवारांच्या विमान अपघातावर शंका उपस्थित केली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेत अनेक विषयांना हात घातला होता. त्यात त्यांनी विमान कंपनीवर देखील आरोप केले आहेत.





सध्या रोहित पवार दिल्लीमध्ये तळ ठोकून आहेत. विमान अपघातामागील खरे कारण शोधण्यासाठी ते हवाई क्षेत्रात वैमानिक किंवा इतर पदांवर काम केलेल्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेत आहेत. तज्ज्ञांकडून माहिती गोळा करून अपघाताची शक्यता, तांत्रिक बाबी आणि नियमांचे पालन झाले होते का, याचा अभ्यास ते करत आहेत. अपघाताच्या चौकशीचा अधिकृत अहवाल येण्यास विलंब होत असल्याने त्यांनी स्वतंत्र पातळीवर माहिती संकलन सुरू केले आहे.

### विलंबामुळेच संशयाला अधिक वाव

या घटनेनंतर संबंधित यंत्रणांकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे. तांत्रिक बिघाड, हवामानातील बदल, मानवी चूक किंवा अन्य कारणे अशा विविध शक्यतांचा तपास केला जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र आतापर्यंत कोणतीही ठोस माहिती अधिकृतरीत्या समोर आलेली नाही. त्यामुळे अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबत स्पष्टता आलेली नाही. या विलंबामुळेच संशयाला अधिक वाव मिळत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## संपादकीय

# कायद्याची भिंत बांधून डीपफेकपासून सुटका?

'कुठल्याही प्रकारचा मजकूर कृत्रिमरीत्या तयार करून कुठल्याही समाजमाध्यमावर टाकला, तर हा मजकूर खरा नसून कृत्रिम आहे, असे त्या मजकुरात स्पष्टपणे दिसले पाहिजे' - अशा आशयाचा कायदा करायची योजना भारत सरकारने आखली आहे. समाजमाध्यमांवर खोटे संदेश जातात, बदनामीकारक मजकूर किंवा चित्रं, तसंच चित्रफिती जातात. यातून अनेक जणांना बरंच काही सोसावं लागतं. याला आळा घालण्याच्या हेतूनं हा नियम करण्यात आला आहे. कृत्रिम मजकूर तयार करताना तशी सूचना किंवा घोषणा सोबत असणं आता अनिवार्य असेल. हे साधणं फार कठीण नाही. यूट्यूबवर चित्रफीत टाकताना संबंधित माणसाला तशी नोंद करावी लागते. काही देशांमध्ये इन्स्टाग्रामवर "एआयनिर्मित" असं मजकुराबरोबर आपोआप दिसतं. असा मजकूर कुणी बघत, वाचत, ऐकत असेल तर त्या वेळेलासुद्धा अशी नोंद दिसली पाहिजे, अशी दुसरी तरतूद आहे. हेसुद्धा फार अवघड नाही. आतासुद्धा अनेक समाजमाध्यमांवर काही मजकुरासोबत "संवेदनशील मजकूर/दृश्य", "जाहिरातसदृश्य मजकूर" असं आपल्याला अशा बाबतीत बघायला मिळतंच. मजकूर किंवा दृश्यांमध्ये कृत्रिम असं काहीतरी समाविष्ट करण्यात आलेलं आहे, अशी माहिती त्या मूळ मजकुरामध्ये किंवा दृश्यामध्ये अदृश्य स्वरूपात भरली गेली पाहिजे, असे तिसरी तरतूद सांगते. तांत्रिक भाषेत याला "मेटाडेटा (म्हणजे मजकुराविषयीची माहिती)" असं म्हणतात. सगळ्या कंपन्यांमध्ये या बाबतीत एकवाक्यता नाही. अडॉबी, मायक्रोसॉफ्ट, गुगल, ओपनएआय या बलाढ्य कंपन्या यासाठी "सिटूपीए" म्हणून ओळखली जाणारी तांत्रिक संकल्पना वापरतात. आपल्याला दिसणार नाही असा; पण अस्तित्वात असलेला अदृश्य वॉटरमार्क यासाठी वापरला जातो. हा मजकूर कुणी/कुठे तयार केला, त्यात कुठे नेमके काय बदल झाले, असा सगळा तपशील नोंदवला जाऊ शकतो. मात्र, विविध कंपन्या हेच तंत्रज्ञान यासाठी वापरतील याची खात्री नाही. त्यांच्यामध्ये एकवाक्यता नसल्यामुळे मजकूर किंवा चित्र तयार होऊन ठिकठिकाणच्या संगणकांवर फिरत राहिल्यानंतर हा मेटाडेटा पूर्णपणे विस्कळीत होऊन जातो. साहजिकच कुणी नेमके काय बदल केव्हा केले हे समजू शकत नाही. यावर कशी मात करायची याचं उत्तर आता तरी कुणाकडेच नाही. या कायद्याची चौथी अपेक्षा कुणीही अशा प्रकारच्या मजकुराविषयी तक्रार नोंदवल्यावर आणि त्यात तथ्य आढळल्यावर ठराविक तासांमध्ये समाजमाध्यमी कंपन्यांनी तो काढून टाकला पाहिजे. हे सहज शक्य आहे. मोठ्या कंपन्या, तर आता यासाठी सतत डोळ्यात तेल घालून पहारा देत असलेल्या लोकांच्या टीम्स बाळगतात. कदाचित छोट्या कंपन्यांना हे साध्य करण्यात अडचणी येऊ शकतात. आता यामधल्या मुख्य अडचणी. कुठला मजकूर एआयचा वापर करून कृत्रिमरीत्या तयार केलेला आहे हे ठरवणं जटील काम आहे. असा मजकूर तयार करणारं एआय (म्हणजे जनरेशन मॉडेल्स) असा मजकूर शोधू शकणाऱ्या एआयपेक्षा (म्हणजे डिटेक्शन मॉडेल्स) खूप जास्त प्रगत आहे. अशा एआयमध्ये सातत्यानं खूप सुधारणा होत असतात. माणसालाही खरं काय आणि खोटं काय हे ओळखणं खूप अवघड जातं. म्हणूनच, सत्याभासी "डीपफेक" चित्रफिती वापरून अनेक जणांची बदनामी, दिशाभूल होत असूनही हे सहजासहजी लक्षात येत नाही.

समजा कुणाचा आवाज वापरून बनावट ध्वनिसंदेश कुणी तयार केला आणि ते करताना मुद्दामच मागे जरा गोंधळ असल्याचा आवाज मिसळला, तर खरं काय आणि खोटं काय हे ठरवताना नाकीनऊ येतात. आधी उल्लेख केल्यानुसार मजकूर, चित्रं, चित्रफिती जणू विजेच्या वेगानं जगभरात एका संगणकातून किंवा फोनमधून दुसरीकडे जात राहतात. साहजिकच कुठे काय तयार झालं, बदललं या सगळ्याचा हिशेब ठेवणं जवळपास अशक्य प्रकार होऊन बसतो. लोक या सगळ्यातून बचावण्यासाठी चित्रं "क्रॉप" करणं, स्क्रीनचं रेकॉर्डिंग करणं, एका फॉर्मेटमधून दुसऱ्या फॉर्मेटमध्ये माहिती किंवा चित्रं वगैरे बदलून टाकणं अशा पळवाटा शोधू शकतात.

## गुरु वचन

### दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होणे हीच इश्वर सेवा

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख-सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या-बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

## उपदेशकथा

### वक्ता नरेंद्र

स्वामी विवेकानंदांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. या नरेंद्राच्या शाळेतील एक शिक्षक निवृत्त होणार होते. विद्यार्थ्यांचे ते लाडके शिक्षक असल्याने त्यांनीच आपल्या गुरुजींसाठी एक निरोप समारंभ आयोजिला होता. समारंभाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांना आमंत्रण होते. ते बंगालमधील एक ख्यातनाम विद्वान आणि देशभक्त होते. आयसीएसची परीक्षा उत्तीर्ण होऊनही इंग्रजांची चाकरी करायची नाही असे ठरवून ते शाळेचे मुख्याध्यापक झाले होते. तसेच ते पट्टीचे वक्ते हेते. अशा व्यक्तीसमोर आपल्यापैकी कोणी भाषण करायचे असा प्रश्न समारंभ आयोजित करणाऱ्या मुलांना पडला. शेवटी नरेंद्रावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. अन् नरेंद्राने खरोखरच फार सुंदर भाषण करून सर्वांची मने जिंकली. भावमधुर शब्द आणि ओघवात वक्तृत्व यामुळे त्यांचे बोलणे ऐकताना सर्वजण भारावून गेले. स्वत: ईश्वरचंद्रांनी त्याची पाठ थोपटली आणि आपल्या भाषणात त्याचे कौतुक केले ! हाच नरेंद्र जेव्हा पुढे स्वामी विवेकानंद झाला, तेव्हाही आपल्या अमोघ वक्तृत्वाने त्यांनी जग जिंकले. शिकागोतील सर्व धर्म परिषदेप्रमाणे अमेरिका, युरोप आणि भारतातील सर्व व्याख्याने गाजली.

कथा उपदेश : शाळेय जीवनात व वक्तृत्वाला सुरवात केल्यास भावी काळात हमखास यश प्राप्त होते.

## पंचांग

पंचांग
१७ फेब्रुवारी २०२५
मंगळवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
कृष्ण पक्ष
तिथि:अमावस्या
१७:३०:५४
नक्षत्र:धनिष्ठा २१:१५:४९
योग:परिध २४:२८:१४+
करण:नाग १७:३०:५४
करण:किस्तुघ्न
२९:१७:५०+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:कुम्भ०९:०५:२५

हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास - शाबान
तारीख - २८
विशेष
माघ अमावास्या
कंकणाकृती सूर्यग्रहण
(भारतातून दिसणार नसल्यामुळे वेधादि नियम पाळू नयेत.)
क्रांतिवीर लहुजी साळवे पुण्यतिथी
नाथयात्रा - मांगरूळ
वासुदेव बळवंत फडके पुण्यतिथी
अमावास्या समाप्ती सायं ५.३०

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 6 | | 3 | 1 | 8 | | |
| 2 | | | 5 | 8 | | 4 | 1 | 3 |
| | 3 | | | 7 | | 9 | | 5 |
| | | | | | 3 | | | |
| | | 7 | | 2 | | 5 | | |
| | | | 7 | | | | | |
| 6 | | 8 | | 1 | | | 9 | |
| 7 | 1 | 2 | | 9 | 4 | | | 8 |
| | | 3 | 6 | 5 | | 1 | 7 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 7 | 3 | 8 | 2 | 6 | 4 | 1 | 9 |
| 4 | 2 | 1 | 7 | 9 | 5 | 8 | 6 | 3 |
| 6 | 8 | 9 | 4 | 3 | 1 | 2 | 5 | 7 |
| 1 | 9 | 4 | 5 | 8 | 3 | 6 | 7 | 2 |
| 2 | 5 | 6 | 1 | 7 | 9 | 3 | 4 | 8 |
| 7 | 3 | 8 | 6 | 4 | 2 | 5 | 9 | 1 |
| 3 | 6 | 7 | 2 | 1 | 4 | 9 | 8 | 5 |
| 8 | 4 | 2 | 9 | 5 | 7 | 1 | 3 | 6 |
| 9 | 1 | 5 | 3 | 6 | 8 | 7 | 2 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८०१ – अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत दोन उमेदवार थॉमस जेफरसन व एरन बर यांना सारखी मते मिळाली. हाउस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हसनी जेफरसनला राष्ट्राध्यक्ष तर बरला उपाध्यक्ष केले.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेच्या सी.एस.एस. हनलीने उत्तरेचे यु.एस.एस. हुसाटॉनिक हे जहाज बुडवले.
- १८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेच्या सैन्याने कोलंबिया, दक्षिण कॅरोलिनातुन पळ काढला. जाताना शहरास आग लावली.
- १८६७ – सुएझ कालव्यातुन पहिले जहाज पसार झाले.
- १९३३ – अमेरिकेत दारूबंदी समाप्त.

### राष्ट्रीय

- २००७ – फरीदकोट जिल्ह्यातील हसतभट्टी गावातील निर्मल कौर या महिलेने एकाच वेळी चार मुलींना जन्म दिला.
- २००८ – कोट्यवधी रुपयांच्या किडनी रॅकेट संदर्भात सीबीआयला हवा असलेला डॉ. अमितकुमारचा भाऊ जीवन राऊत याला दिल्लीत अटक करण्यात आली.

### जन्म

- १८१७ – विल्यम तिसरा, नेदरलँडचे राजा यांचा जन्म.
- १८८० – अलवारो ओबरेगन, मेक्सीकोचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ३६४ – जोव्हियन, रोमन स्म्राट यांचे निधन.
- १९१९ – विल्फ्रिड लॉरिये, कॅनडाचा पंतप्रधान यांचे निधन.
- १९३४ – आल्बर्ट पहिला, बेल्जियमचे राजा यांचे निधन.
- २००८ – मनोरमा, प्रसिद्ध बॉलीवुड चित्रपट अभिनेत्री यांचे निधन.

## : SMS :

Sardarni walking on road with her top open & Right BOOB hanging out.. Cop asks: what is this? Sardarni realises:Hai Rabba!Munna BUS me hi reh gaya.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.६ | १८.२ |
| अहमदनगर | २८.७ | १६.५ |
| अकोला | ३२.१ | २०.६ |
| अमरावती | ३१.२ | २०.१ |
| बीड | ३२.९ | १९.३ |
| भंडारा | ३१.५ | २० |
| बुलढाणा | २६.६ | ११.७ |
| चंद्रपूर | ३२.७ | २०.२ |
| चेन्नई | ३२.२ | २२ |
| नवी दिल्ली | २७ | १२.३ |
| धुळे | ३१.६ | १९.१ |
| गोंदिया | ३०.२ | १९.६ |
| जळगाव | ३२.३ | १८.८ |
| कोल्हापूर | ३० | १४.४ |
| लातूर | ३०.३ | १७.८ |
| मुंबई | ३३.६ | २४ |
| नागपूर | ३०.८ | २०.६ |
| नांदेड | ३१.५ | १९.५ |
| नंदूरबार | ३०.१ | १८.३ |
| नाशिक | ३० | १७.२ |
| पुणे | २९.४ | १६.३ |
| पंढरपूर | ३०.३ | १७.६ |
| सातारा | ३०.३ | ११.१ |
| सांगली | ३०.२ | १५ |
| सोलापूर | ३०.८ | १९.६ |
| वर्धा | ३२.२ | १९.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण योजना पूर्ण झाल्याशिवाय काम हाती घेवू नका. स्वत:चा काम करावे लागेल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम मनातील इच्छेनुसार कामे पूर्ण होतील. आपले विरोधक कामाची प्रशंसा करतील.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण महत्वपूर्ण गोष्टींचा विचार कराल. आळस सोडून देऊन सक्रीय व्हावे लागेल. भेट वस्तू मिळेल.

**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व मित्रांच्या सहकार्यामुळे मनोर्धर्य वाढेल. प्रसन्नता वाटेल, आर्थिक लाभाची शक्यता महत्वाच्या कामांसाठी खर्च होईल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व सामाजिक कार्यात मग्न रहाल.वाहन सुख मिळेल. वेळेचा उपयोग होईल.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम आर्थिक लाभ होईल. आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. आरोग्याची काळजी घ्या.


**धनु :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व सामाजिक कार्यात व्यापून जाल, धंद्यात नवीन योजना हाती घ्याल, मुलांच्या रोजगाराची चिंता राहील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६२



### आडवे शब्द

१. फक्त एकच, केवळ
४. काव्य, गीत
७. नीच, दुष्ट
१०. कर्णाच्या अंतिम पराभवाला निमित्त ठरलेले, श्री. ना. पेंडसे यांची गाजलेली कादंबरी
११. चित्तथरारक
१३. किराणा व्यापारी
१४. माध्यान्हीला पोटात होणारा काकरव
१५. ओळख देण्याची एक पद्धत
१७. नुसताच बडबड्या
१९. बहर
२०. गोडी
२२. विद्युल्लता
२३. उत्तराधिकार
२७. महिरप
२८. वडील
२९. पोथी गुंडाळून ठेवण्याचे कापड
३०. कपाळ फुटणे
३२. इशाऱ्याचा एक शब्द
३४. मार्ग, रस्ता
३५. सुस्ती
३६. कडक व चिवट
३८. लोणच्याचा अर्क
३९. पूर्वी नवरदेवासाठी हमखास शिवला जाणारा
४०. स्तुती करणारा
४१. कुचकट
४३. भराभरा फुगणे
४४. अपशकुन
४६. दूध, खीर
४७. पृथ्वी
४९. सरसकट
५१. घरातील महिलावर्ग
५३. लिहिण्याची चोपडी
५५. बाष्प
५६. उठताबसता बोल बोल बोलणे!
५८. टणटणीच्या झाडाचे खरे नाव
५९. मजबूत, राकट
६१. यज्ञ
६३. हस्त पण नक्षत्र नव्हे
६५. धीरपोटी गोमटी फळे येतात याअर्थी हिंदीतील म्हण- '---- फल मीठा होता है!'
६८. लहान मूल
६९. दीक्षितांच्या माधुरीचे लग्नानंतरचे आडनाव
७०. बारीकसारीक बाबींसह
७४. किल्ला इ. च्या संरक्षणासाठी ठेवलेला फौजफाटा, सैनिकांची तुकडी
७७. उष्ण
७८. पोपट
८०. हालचाल
८३. आतील गोटातील
८४. पुण्यातील पार्वतीमागील टेकडीवर असलेले देवीचे स्थान
८५. जंगलाला लागलेली आग

### उभे शब्द

१. काखोटीला
३. दिखाऊ, वरपांगी
४. झाडून काढलेला
५. अनेक पराक्रम करणारा
६. चंद्र
७. आनंद
८. अर्धांगवायू
९. कुचेष्टा करणारा
११. इटलीची राजधानी
१२. उपस्थित
१४. श्रम, खूप मेहनत
१६. गवंडी
१८. धूर्त
२१. देखत, समोर
२३. उपयोग, उपभोग
२४. समुद्रकिनारा
२५. मनातील इच्छा दाबणे
२६. सुटकेचा मार्ग
२८. मुद्दा, प्रकरण
३१. विहीरीतून पाणी काढण्याचे एक साधन
३२. अफूचे बी
३३. हक्क, आग्रही प्रतिपादन
३५. कहाणीतील गाव
३७. वाघाचे ओरडणे
३८. पदरमोड करणे
३९. पराकाष्ठेचा लाभ
४२. भेदरट, भित्रा
४४. नासाडी
४५. मंदवासर
४८. शंकर-पार्वतीचा आवडता खेळ
५०. त्रिदोषांपैकी हिवाळ्यात वाढणारा
५२. विद्वान पुरुषांचे कर्णभूषण
५४. तावातावाने
५५. युद्ध (इंग्रजी)
५७. धीट, साहसी
५८. कर्कश, चिरक्या आवाजात ओरडणारा 'शहरी' पक्षी
५९. कमी करणे
६०. दर्यावर्दी
६२. चामखीळ
६३. वेदना
६४. एक शेंगभाजी
६६. शेतकरीवर्गाला हमखास दिली जाणारी उपमा
६७. शिवशंभोंची नगरी
६८. ढग (हिंदी)
७१. पुन्हा
७२. निकट, जवळ
७३. रेंगाळत- --- गमत
७५. इंग्रजीत जुडगा
७६. सणावारांचा महिना
७९. कृष्णाकाठचे ढोल्या गणपतीचे गाव
८१. नूतन
८२. सत्ता

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.मटकन ४.जनावर ७.विसरभोळा १०.पाखर १२.वासा १५.ललाट १७.मामा १९.मनाई २०.सवड २१.दमा २२.वर २३.बाजरी २४.परवा २६.माहेरवाशीण २८.समा २९.मशाल ३२.अजगर ३५.जल ३६.हालचाल ३९.वग ४०.तडक ४१.पपनस ४३.कवच ४४.रद ४५.रखवालदार ४८.मला ४९.चुचकारणे ५०.सलग ५१.सखी ५२.मुख ५३.परत परत ५७.सखा ६०.थट्टामस्करी ६१.जनक ६३.पाव ६५.क्षमायाचक ६७.बालगीत ७०.रौप्यपदक ७३.आंबट ७४.रुसवा ७५.साक्ष ७६.पणजोबा ७७.कारण

उभे उत्तर : १.मजल दर मजल २.कपाट ३.नख ५.नाका ६.रवाना ८.सरासरी ९.भोकाड पसरणे ११.रमावर १३.साईबाबा १४.कडवा १६.लामा १८.मारवा १९.मरण २५.रमा २६.माल २७.शीतल ३१.टोपपदर ३२.अवसार ३३.जग ३४.समाचारपत्र ३६.हातचलाखी ३७.लड ३८.चाकरचुकर ४१.परका ४२.सवाल ४३.कला ४६.खसखस ४७.लगत ४८.मनोरथ ५१.सकाम ५३.परीक्षक ५४.तनया ५५.रजक ५६.तन ५८.खाजगी ५९.कृपा ६२.कबाब ६४.वहिवाट ६६.चरण ६८.लटका ६९.तरुण ७०.रौप्य ७१.पसा ७२.दक्ष ७३.आंबा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## प्लंबिंग विषयी कार्यशाळा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कौशल्यविकासांतर्गत विशेष उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : प्लंबिंग हा विषय केवळ नळ दुरुस्तीपुरता मर्यादित नसून तो आरोग्य, स्वच्छता आणि जलसंधारणाशी निगडित आहे, हे शिकवित नऱ्हे येथील जाधवर इन्स्टिट्यूटमध्ये प्लंबिंग विषयी कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये विविध व्यवसायांबद्दल कुतूहल निर्माण करणे हा मुख्य उद्देश होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि राष्ट्रीय कौशल्य योग्यता फ्रेमवर्क यांच्या समन्वयामुळे शालेय शिक्षणात आता व्यावसायिक शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, इयत्ता ६ वी ते ८ वी या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षणाचा पाया रचला गेला आहे. विद्यार्थ्यांना पाईप्स, फिटिंग्स आणि बेसिक रिपेअरिंगसह प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा वाढते आणि त्यांना तांत्रिक कामांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. हा या मागचा उद्देश होता.



## राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशनची स्थापना

■ पुण्यातील सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, राष्ट्रीय कर्तव्य अभियान समूहाचा पुढाकार

पुणे (दैनिक संध्या) : रासायनिक खते व कीटकनाशकांच्या प्रभावामुळे भारतातील ३० टक्के जमिनी नापिक झाल्या आहेत, देशात दरवर्षी पंधरा लाख पेक्षा अधिक नागरिकांना कॅन्सर सारखा गंभीर आजार होत आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी, ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी अथवा पर्यावरण संतुलनासाठी नैसर्गिक शेतीची लोकचळवळ उभारणी करणे काळजी गरज आहे. यासाठी संत गजानन महाराज प्रगट दिनाचे निमित्त साधून, पुण्यातील सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, राष्ट्रीय कर्तव्य अभियान समूहाच्या माध्यमातून, सदगुरु दुंडा महाराज (देगलूरकर) मठ पंढरपूर येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशन ची स्थापना करण्यात आली. या वेळी कृषी भूषण तात्या मगर, राष्ट्रीय कर्तव्य अभियानाचे मुख्य विजय वरुडकर, संघ जिल्हा कार्यवाह प्रताप टपले, सोशल रिस्पॉन्सिबिलिटी समूहाचे संचालक आचार्य ज्ञानेश्वर शिंदे, खुशालचंद मोरे, सुरेश घाडगे, पांडुरंग बरळ, दत्तात्रय हरळे, गजानन मगर, नानासाहेब जाधव, हनमंत जाधव, कलप्पा भतगुणकी, उदय मुळे, विठ्ठल क्षीरसागर, अरुण जगताप, प्रताप देशमुख, शुभम अडबाल, डॉ बापु तारसे इतर शेतकरी उपस्थित होते. सोशल रिस्पॉन्सिबिलिटी समूह गेली १२ वर्षा पेक्षा अधिक काळ सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. आज पर्यंत सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या राज्यातील ३००० पेक्षा अधिक सामाजिक संस्था, १००० पेक्षा अधिक गोशाळा गोपालक, ५००० पेक्षा अधिक कीर्तनकार यांची बांधणी करण्यात आली आहे. मागील वर्षी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून ५००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती विषयी प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले होते. ग्रामीण स्वावलंबन विषयी काम करतांना गट शेतीतून कृषी उद्योग विकसित करणे हा हेतू ठेऊन राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशन कार्यरत असणार आहे. भविष्यात उद्योगांचे दाईत्व आलेल्या सीएसआर प्रकल्पांची जोडणी ग्राम समस्या निवारणासाठी व नैसर्गिक शेती प्रकल्प गतिशील करण्यासाठी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी समूह प्रयत्नशील असेल, असे विजय वरुडकर यांनी सांगितले.



## 'छत्रपती' घराण्याच्या चार पिढ्यांनी 27 वर्षे औरंगजेबाला झुंजविले : लेखक केतन पुरी

पुणे (दैनिक संध्या) : जगाच्या ८ ते ९ टक्के भूभागावर औरंगजेबाचे राज्य होते. तसंच त्याच्याकडे ३.५ ते ४ लाख इतके सैन्य होते. तरी देखील त्याच्या विरोधात लढा देत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि ताराराणी साहेब अशा 'छत्रपती' घराण्याच्या चार पिढ्यांनी तब्बल २७ वर्षे औरंगजेबाला महाराष्ट्रात झुंजविले. जगाच्या इतिहासात असे एकमेव उदाहरण आहे, असे सांगत लेखक केतन पुरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब यांच्या काळातील समकालीन घटना, दुर्मिळ चित्रे आणि पत्रव्यवहार शिवप्रेमींसमोर उलगडला. सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे शिवजयंती निमित्त आयोजित शिवमहोत्सवाचे उद्घाटन कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरासमोरील जय गणेश प्रांगण येथे करण्यात आले. यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, अमोल चव्हाण, राजाभाऊ घोडके आदी उपस्थित होते. केतन पुरी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब या दोघांच्याही जीवनात अनेक घटना समान आहेत. मात्र छत्रपती शिवरायांची बाजू न्यायाची आणि औरंगजेबाची बाजू अन्यायाची पाहायला मिळते. औरंगजेब आणि शिवरायांनी आपापले शत्रू मारले. मात्र, त्यामागील दोघांच्याही विचारांमध्ये फरक होता. शिवरायांची याबाबतची शिकवणं व विचार आदर्शवत आहे. प्रकाश चव्हाण म्हणाले, दिनांक १९ फेब्रुवारी पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिवव्याख्यान, मृत्युंजय हे महानाट्य, शिवकालीन युद्धकला - मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक अशा विविध कार्यक्रमांचा समावेश आहे. उत्सवाच्या पहिल्याच दिवशी दिव्यांगांकरिता मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोफत व्हिलचेअर, ट्रायसिकल, स्वयंचलित हात वाटप करण्यात आले. तसेच दररोज सायंकाळी ७ वाजता व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवजयंतीच्या दिवशी गुरुवारी (दि.१९) दुपारी ४ वाजता पारंपरिक वाद्यवादन होणार असून सायंकाळी ७ वाजता शिवसाई प्रतिष्ठान ट्रस्ट निर्मिती गणेश लोणारे व सहकारी प्रस्तुत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील मृत्युंजय हे धगधगते महानाटय सादर होणार आहे. सर्व कार्यक्रम शिवप्रेमींसाठी विनामूल्य खुले असून पुणेकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही प्रकाश चव्हाण यांनी केले आहे.

# एएसएम चेअरमनचा 'डिजिटल ट्विन' अवतार

### एआय क्रांतीची दमदार सुरुवात : नॅशनल एआय मिशनशी सुसंगत एएसएम एआय फेस्टचा व्यापक प्रारंभ

पुणे (दै. संध्या) :

कृत्रिम बुद्धिमत्ता काळात देशाच्या शिक्षण क्षेत्रातील एक ऐतिहासिक क्षण म्हणून एएसएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने ९ फेब्रुवारी रोजी 'एएसएम एआय फेस्ट २०२६'ची भव्य सुरुवात केली. या अनोख्या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी औद्योगिक शिक्षण मंडळाचे चेअरमन डॉ. संदीप पाचपांडे यांच्या एआय-आधारित 'डिजिटल ट्विन' अवताराने दूरस्थ अंतरावर असलेल्या विविध दहा कॅम्पसमध्ये एकाच वेळी बीजभाषण करत उपस्थितांना थक्क केले. डॉ. पाचपांडे प्रत्यक्ष उपस्थित असताना त्यांच्या अत्याधुनिक एआय 'डिजिटल ट्विन'ने हजारो विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना संबोधित केले. या अनोख्या प्रयोगामुळे एआयच्या युगात शैक्षणिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाची नांदी दिली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.



हा उपक्रम भारत सरकारच्या 'इंडियन आय मिशन' आणि 'डिजिटल इंडिया' या महत्त्वाकांक्षी ध्येयांशी सुसंगत आहे. शिक्षणाच्या दैनंदिन प्रक्रियेत, वर्गातील अध्यापनापासून ते प्रशासकीय कामकाजापर्यंत एआयचा समावेश करून एएसएम भारताला जागतिकस्तरावरील कुशल एआय मनुष्यबळ निर्माण करण्याच्या पंतप्रधानांच्या उद्दिष्टाला हातभार लावला जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

'लर्निंग टुडे, . लिडिंग टुमारो' या संकल्पनेवर आधारित एएसएम एआय फेस्ट २८ फेब्रुवारीपर्यंत सर्व शाळा आणि महाविद्यालयात सुरू राहणार आहे. या महोत्सवात सहा हजारांहून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग असून, प्रत्यक्ष अनुभवाधारित प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे. शिक्षण, संशोधन, अध्यापन पद्धती आणि संस्थात्मक व्यवस्थापन या सर्वस्तरांवर एआयचा प्रभावी वापर करण्यासाठी ही व्यापक कौशल्य चळवळ उभारण्यात आली असल्याचे डॉ. पाचपांडे यांनी सांगितले.

पारंपरिक अभ्यासक्रमाच्या चौकटीबाहेर जाऊन जागतिक दर्जाच्या एआय तज्ज्ञांकडून या सर्व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक पदवीधर विद्यार्थ्याने 'एआय फर्स्ट माईंडसेट' अंगीकारवा, एआयला प्रतिस्पर्धी नव्हे तर सशक्तीकरणाचे साधन समजून कौशल्य कुशलता प्राप्त करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याने ते म्हणाले.

"एआय माणसांची जागा घेईल, अशी भीती व्यक्त केली जाते. मात्र आमचा दृष्टिकोन वेगळा आहे. जे एआयचा योग्य वापर करतील, तेच पुढे जातील," असे प्रतिपादन डॉ. पाचपांडे यांनी केले. "हा महोत्सव आमचे विद्यार्थी आणि शिक्षक यांना यशाच्या बाजूला उभे करेल," असेही त्यांनी स्पष्ट केले.

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व संस्थांमध्ये समारोप सोहळा होणार असून, चेअरमन यांच्या नेतृत्वाखाली संचालक, डीन आणि प्राचार्यांनी या भव्य उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केली आहे.

एआय-संलग्न शिक्षण क्षेत्रात एएसएमने अग्रणी भूमिका घेतल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.

> "औद्योगिक शिक्षण मंडळाने गेल्या चार दशकांहून अधिक काळात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधुनिक बदलांची दखल घेत हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण प्रशिक्षण देत उभे केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही एआयच्या वापरातील आव्हाने, कौशल्य विकास आणि माणसांच्या दैनंदिन जगण्याशी संबंधित संशोधन यावर लक्ष केंद्रित केले आहे. एआय फेस्ट हा दीर्घकालीन उपक्रम आहे. तो इतर अनेक शैक्षणिक संस्थांनाही दिशाआणि प्रेरणा देईल. भारत सरकारच्या एआय धोरणाला सुसंगत असा हा प्रयोग आहे."
>
> - डॉ. संदीप पाचपांडे



## समाजकार्याचे यशस्वी प्रयोग समाजव्यापी व्हावेत : अतुल लिमये

■ जनकल्याण समितीतर्फे दादा लाड आणि महंत भारतभूषणदासजी महाराज यांना 'श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान

पुणे (दै. संध्या) :

"समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तनाचे अनेक यशस्वी प्रयोग वैयक्तिक पातळीवर सुरू आहेत. मात्र, हे प्रयोग केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न राहता समाजव्यापी होण्याची गरज आहे. तसे झाल्यास अशा प्रयोगांतूनच खऱ्या अर्थाने व्यवस्था परिवर्तन घडून येईल," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांनी शनिवारी येथे केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रसिद्ध उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## दिव्यांग मुलांच्या चेहऱ्यावर उमटला आकाशाचा आनंद

'व्हॅलेंटाईन डे'निमित्त ओवायई फाउंडेशनचा उपक्रम; ३५ मुलांना हेलिकॉप्टर राईडचा अनुभव

पुणे (दै. संध्या) :

आकाशात उडणारे हेलिकॉप्टर अनेकांनी पाहिलेले असते; पण त्यात बसण्याचा अनुभव प्रत्येकाला मिळत नाही. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने ओय फाउंडेशन आणि महालक्ष्मी एव्हिएशन यांनी दिव्यांग मुलांसाठी असा क्षण साकारला, ज्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे तेज खुलले. ओपन युअर आईज (ओवायई) फाउंडेशनच्या संस्थापिका डॉ. सिमरन जेठवानी यांच्या पुढाकाराने व महालक्ष्मी एव्हिएशनचे नितीन गोते, कॅप्टन नितीन वेल्डे यांच्या सहकार्याने ३५ मुलांना सहा मिनिटांची हेलिकॉप्टर सफर घडवून आणण्यात आली. हेलिकॉप्टर जमिनीवरून अलगद वर झेपावताच मुलांनी आनंदाने हात हलवत खाली पाहिले. काहींनी पहिल्यांदाच शहराला वरून पाहत आश्चर्य व्यक्त केले, तर काहींच्या डोळ्यांत उत्साहाश्रू चमकले. 'आज आम्हीही उडालो अन आमची स्वप्नपूर्ती झाली,' असे एका मुलाने हसत सांगितल्यावर उपस्थितांचे मन भारावले. हेलिकॉप्टर उड्डाण करताच सहभागींच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह उपस्थितांसाठीही भावूक करणारा ठरला. डॉ. सिमरन जेठवानी म्हणाल्या, "या मुलांना फक्त एक राईड नव्हे, तर आयुष्यभर जपून ठेवतील अशी आठवण द्यायची होती. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून आमचा उद्देश सफल झाला. हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर संवेदनशीलतेचा संदेश होता. आनंद वाटल्यानेच वाढतो. छोट्या कृतीतून मोठा आनंद देत समाजात समावेशकतेची भावना दृढ करणारा हा दिवस आहे. दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर संधी आणि सन्मान देणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, समाजाशी संवाद वाढतो आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाव्यात हा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला." दिव्यांगांना हेलिकॉप्टर राईड घडविण्याची विनंती डॉ. जेठवानी यांनी आमच्याकडे केली. त्यानंतर सामाजिक भावनेतून आम्हीही याला प्रतिसाद दिला आणि आज ३५ मुलांना हा अविस्मरणीय आनंद देऊ शकलो, याचे समाधान वाटतेय. समाजात समावेशकतेचा संदेश देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला असून, भविष्यात आणखी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संस्थांचा मानस आहे, असे नितीन गोते यांनी सांगितले.



## डिवाइन जैन ग्रुप ट्रस्टतर्फे फ्रंटलाइन 'जंगलवीरांचा' अभूतपूर्व सन्मान

पुणे (दै. संध्या) :

गेल्या १५ वर्षांपासून समाजसेवेचा वसा जपणारे आणि पुणे केंद्रस्थानी ठेवून देशभर ५००० हून अधिक सदस्यांच्या बळावर कार्यरत असणाऱ्या 'डिवाइन जैन ग्रुप ट्रस्ट' (DJGT) च्या वतीने एका आगळ्यावेगळ्या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सह्याद्री टायगर रिझर्व्हमधील अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या फ्रंटलाइन जंगलरक्षकांचा (वनरक्षक) भव्य सन्मान आणि रोमांचक व्याघ्र सफारीने हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

सह्याद्री वाइल्डलाइफ फाउंडेशन आणि सह्याद्री टायगर रिझर्व्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात, जंगलाच्या रक्षणासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या खऱ्या 'शौर्यवीरांचा' सन्मान करण्यात आला. कोल्हापूर येथील चांदोली नॅशनल पार्कमध्ये हा सोहळा पार पडला. यावेळी तुषार चव्हाण (क्षेत्रसंचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर), संदेश पाटील (सहाय्यक वनसंरक्षक, चांदोली), ऋषिकेश पाटील (वनपरिक्षेत्राधिकारी, चांदोली), डिवाइन जैन ग्रुपच्या वतीने संकेत शाह, चेतन जैन, तेजपाल ओस्वाल आणि तनिश जैन यांच्या हस्ते वनरक्षकांना विशेष बॅगा आणि सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले.



वन्यजीव संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या सह्याद्री वाइल्डलाइफ फाउंडेशनचे अध्यक्ष आशिष पिलानी यांच्यासह संचालक मंडळातील निखिल जोशी, डॉ. पृथ्वीराज जाधव, आदित्य जाधव, गोपाल मर्दा, मिलिंद घाडगे, रोनक पाटील आणि मयुर शहा यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

सन्मान सोहळ्यानंतर ट्रस्टच्या सदस्यांसाठी विशेष जंगल सफारी आयोजित करण्यात आली होती. या सफारीदरम्यान सदस्यांना निसर्गाच्या सानिध्यात वाघाचे प्रत्यक्ष दर्शन झाले. फ्रंटलाइन स्टाफ नेमक्या किती कठीण परिस्थितीत काम करतो, याचा अनुभव घेतानाच व्याघ्र दर्शनाने सदस्यांचा थरार द्विगुणित झाला. पर्यावरण रक्षणाची जाणीव अधिक दृढ करणारा हा अनुभव असल्याचे सदस्यांनी सांगितले.

कार्यक्रमाप्रसंगी बोलताना डिवाइन जैन ग्रुप ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष संकेत शाह म्हणाले की, "सह्याद्री टायगर रिझर्व्ह हे केवळ पर्यटन स्थळ नसून आपल्या पर्यावरणाचे फुफ्फुस आहे. जनतेने मोठ्या संख्येने या व्याघ्र प्रकल्पाला भेट द्यावी. तुमची उपस्थिती इथल्या पर्यटनाला चालना देईल आणि आपल्या फ्रंटलाइन वीरांना प्रोत्साहन मिळेल.

## संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न



पुणे (दै. संध्या) :

भोर येथील निवासी मूक बधिर विद्यालय व पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय यांचे "संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन " दिनांक १२ फेब्रुवारी व १३ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवशी विविध गुणदर्शन समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमात निवासी मूकबधिर विद्यालय,आणि भो. ए. सो. पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन २४ कार्यक्रम सादर केले . शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी "वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ" संपन्न झाला . सकाळी ११-३० ते १-०० या वेळेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले.त्यानंतर दुपारी ३-३० वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून पुण्यातील औद्योगिक औषधीशास्त्र सल्लागार मोहन मोने,उद्योजक व गुंतवणूक सल्लागार मंदार ओक,राष्ट्रीय बुद्धिबळ खेळाडू प्रकाश देशपांडे हे होते.

# महापुरुषांना 'स्वच्छांजली'! स्वच्छता मोहिमेचा शानदार शुभारंभ

### नगरसेवक सनी निम्हण यांचा उपक्रम

पुणे (दै. संध्या) :

आदर्श घेऊन महापुरुषांचा, संकल्प करू स्वच्छतेचा! छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला कल्याणकारी राज्याचा वारसा आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला देशसेवेचा संस्कार जपत, औंध-बोपोडी प्रभागात 'महापुरुषांना स्वच्छांजली' या अभिनव मोहिमेचा आज १६ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात शुभारंभ करण्यात आला.

प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक सनी निम्हण यांच्या पुढाकाराने ही मोहीम शिवजयंती ते भीमजयंती (१९ फेब्रुवारी ते १४ एप्रिल) या काळात राबवण्यात येणार आहे. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादनच नव्हे, तर त्यांच्या विचारांतून कृतीशील स्वच्छता अभियान राबवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवरांची उपस्थिती

या मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर आणि नगरसेविका सपना छाजेड यांनी विशेष उपस्थिती दर्शवून मोहिमेत सहभाग घेतला. तसेच औंध क्षेत्रीय कार्यालयाचे स्वच्छता कर्मचारी, आरोग्य सेवक आणि विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष स्वच्छतेचे काम करून या मोहिमेला बळ दिले. यावेळी परिसरातील ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नागरिकांच्या सहभागासाठी 'QR कोड' सुविधा

ही मोहीम केवळ सरकारी उपक्रम न राहता ती लोकचळवळ व्हावी, यासाठी नगरसेवक सनी निम्हण यांनी डिजिटल पाऊल उचलले आहे. प्रभागातील नागरिकांना आपल्या परिसरात कुठेही स्वच्छतेची आवश्यकता वाटल्यास, त्यांनी 8308123555 ह्या नंबर वर किंवा खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे:

* QR कोड स्कॅन करा: मोहिमेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेला QR कोड स्कॅन करावा.
* माहिती पाठवा: स्वच्छतेची गरज असलेल्या जागेचा फोटो आणि लोकेशन पाठवावे.
* तात्काळ दखल: प्राप्त तक्रारीनुसार त्या जागेची तातडीने स्वच्छता करून प्रभाग स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी टीम तत्पर असेल.

> "आपल्या महापुरुषांनी आपल्याला समाजसेवेचा आणि शिस्तीचा मार्ग दाखवला आहे. त्यांना खरी आदरांजली वाहण्यासाठी आम्ही ही 'स्वच्छांजली' मोहीम सुरू केली आहे. नागरिकांनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा."
>
> — सनी निम्हण (नगरसेवक, प्रभाग क्र. ८)

## थोडक्यात पण महत्वाचे...



### व्यवसाय कर रद्द करण्यासाठी व्यापाऱ्यांचे प्रांताधिकारी वैभव नावडकर यांना निवेदन

बारामती (दैनिक संध्या) : बारामती व्यापारी महासंघ यांच्यातर्फे श्री. वैभव नावडकर, प्रांतअधिकारी,बारामती यांना व्यवसाय कर रद्द करणेबाबत निवेदन मा.श्री देवेंद्र फडवणीस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या नावाने देण्यात आले. व्यवसाय कर हा सर्वसामान्य नोकरदार वर्ग, व्यापारी उद्योजक यांच्यावर अतिरिक्त व अन्यायकारक आर्थिक भार टाकणारा ठरत आहे. व्यवसाय कर रद्द झाल्यास व्यापाऱ्यांना आर्थिक दिल्यास मिळेल व नव उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल.सरकारने या विषयाचे गांभीर्याने दखल घेऊन व्यवसाय कर रद्द करणे बाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती बारामती व्यापारी महासंघातर्फे करण्यात आली.यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुशील कुमार सोमानी, जगदीश पंजाबी,स्वप्निल मुथा,प्रशांत चांदगुडे,महेश ओसवाल,मनोज मुथा, प्रवीण आहूजा,सलीम तांबोळी इत्यादी उपस्थित होते.

### बारामतीतील तिरंगा सर्कल चौकात उभारणार अजित पवारांचा ब्राँझचा पुतळा



बारामती (दैनिक संध्या) : बारामती शहराच्या मध्यवर्ती असलेल्या या तिरंगा सर्कल चौकात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दिडटन वजनाचा व दहा फुट उंची असलेला ब्राँझचा पुतळा बसविण्यात येणार आहे.तसेच या चौकाचे नाव तिरंगा सर्कल असून त्याचे अजित तिरंगा सर्कल असे नामकरण करावे व नटराज कला दालनाचे नाव अजित कला दालन करण्यात यावे व त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या सक्षम प्राधिकरणाकडून घेणार आहोत व इथून पुढे अजित पवार यांचा येणारा वाढदिवस दोन ते तीन दिवसाचा अजित लोककला महोत्सव बारामतीमध्ये साजरा होणार आहे.अजित पवार यांच्या आठवणी बारामतीकरांच्या मनात रहाव्यात यासाठी नटराज कला दालन याठिकाणी कायमस्वरूपी दादांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन सुरू राहणार असल्याचे व महाराष्ट्र राज्यातील जनतेकडे जर अजित पवार यांचे जुने फोटो,व्हिडीओ असतील तर नटराज कला दालन बारामती येथे पाठवावेत जे पाठवतील त्यांच्या नावाच्या सौजन्याने छायाचित्र प्रदर्शनात सर्वांना पाहण्यासाठी ठेवण्यात येतील,तरी फोटो,व्हिडीओ पाठवावेत असे आवाहन किरण गुजर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### दिवंगत अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ श्रमदान स्वच्छता अभियान



■ श्री.सचिन सातव (नगराध्यक्ष), श्री.राजेंद्र सोनवणे (नगरसेवक), सौ. अश्विनी सातव (नगरसेविका) यांच्याकडून श्रमदान

बारामती (दैनिक संध्या) : प्रभाग क्रमांक 18 शारदानगर येथील जाधव वस्ती,पवार वस्ती याठिकाणी आ.अजितदादा यांना श्रद्धांजली वाहुन मोहीमेला सुरुवात करण्यात आली.यावेळी आजूबाजूच्या परिसरात श्रमदान स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.श्रमदान स्वच्छता अभियान मोहीम आपल्या नगरीचे लोकप्रिय नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार 'दर रविवारी' बारामती शहराच्या विविध भागांत श्रमदान स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून प्रभागातील नगरसेवक सौ.अश्विनी सातव,श्री.राजेंद्र सोनवणे, श्री.सुरज सातव यांच्या उपस्थितीत तसेच स्वच्छता निरीक्षक श्री.अजय लालबिगे साहेब,अक्षय माने, स्वच्छतादूत कर्मचारीसह एनडीके कंपनीचे सुपरवायझर अभिजीत शेंबडे,महावीर गायकवाड यांच्यासह परिसरातील व अजितदादा प्रेमी युवक वर्ग,महिला वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने श्रमदान स्वच्छता अभियान मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी श्रमदान स्वच्छता मोहीमेमध्ये सहभागी झाले होते.

### वर्षात 15 दिवस मध्यरात्रीपर्यंत ध्वनिवर्धक वापरास परवानगी

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियमानुसार, चालू आर्थिक वर्षात १५ दिवस ध्वनिक्षेपक आणि ध्वनिवर्धकाच्या वापरासाठी सकाळी सहा वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यास परवानगी देण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काढले आहेत. त्यानुसार, शिवजयंती १९ फेब्रुवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल, महाराष्ट्र दिन १ मे, गणपती उत्सव, ईद ए-मिलाद आणि अनंत चतुर्दशीकरिता १९, २०, २२, २३, २४ आणि २५ सप्टेंबरपर्यंत सहा दिवस, नवरात्री उत्सव १९ व २० ऑक्टोबर, ख्रिसमस (नाताळ) २५ डिसेंबर आणि वर्षाअखेर ३१ डिसेंबर, तसेच महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी दोन दिवस राखीव ठेवण्यात आले असून, आवश्यकतेनुसार परवानगी दिली जाईल, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी आदेशात नमूद केले आहे. उत्सवाच्या दिवशी ध्वनीची विहित मर्यादा राखून ध्वनिक्षेपक, ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्यास मर्यादा शिथिल करून पुढील अटींवर परवानगी देण्यात येईल.



## क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरमने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड रचला

पुणे (दै. संध्या) :


क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरम (सीईएफ) यांनी १५ फेब्रुवारी रोजी पुणे येथे जगातील सर्वात मोठ्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये आपले नाव नोंदवले. ही कामगिरी विशेष आहे कारण बॉक्स क्रिकेटसाठी यापूर्वी जगात कोणताही गिनीज विक्रम अस्तित्वात नव्हता—अशा प्रकारे (सीईएफ) ने नवीन गिनीज शीर्षक निर्माण केले. या विक्रमाकडे नेणाऱ्या प्रवासाची सुरुवात ३ फेब्रुवारी २०२६ रोजी बावधन, पुणे येथे क्रायसॅलिस एसएमई लीगच्या औपचारिक उद्घाटनाने झाली. पुढे हीच स्पर्धा आतापर्यंतची सर्वात मोठी बॉक्स क्रिकेट स्पर्धा ठरली. या लीगमध्ये ६६ संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघात ११ वेगवेगळे खेळाडू असून एकूण ७२६ कर्मचारी सहभागी झाले. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक संघ पूर्णपणे लघु व मध्यम उद्योगांतील (एसएमईएस) कर्मचाऱ्यांपासूनच बनलेला होता.

महाशिवरात्री निमित्त श्री.गुरु विठ्ठलनाथ महाराज देवस्थान तिर्थक्षेत्र येथे

# महाप्रसाद सोहळ्याचे आयोजन

नांदेड (दै. संध्या) :

श्री.गुरु विठ्ठलनाथ महाराज मंदिर देवस्थान गोपाळचावडी ता.जि.नांदेड येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी अखंड दत्तनाम सप्ताह,पालखी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी आपण या सोहळ्यास उपस्थित राहून गुरू अमृताचा लाभ घ्यावा अशी विनंती संस्थानच्या वतीने करण्यात आली असून दि.११ फेब्रुवारी बुधवार रोजी पहाटे ५ वाजता श्री.महंत आनंदबन महाराज गुरू गंभीरबन महाराज मठ संस्थान तुप्पा यांच्या हस्ते महापुजा करून दत्तनाम सप्ताहास प्रारंभ व ७ दिवस अखंड दत्तनाम सप्ताहास सुरूवात होईल. आज दि.१७ फेब्रुवारी मंगळवार रोजी आमावस्येच्या दिवशी दुपारी ०१.३० वाजता त्रिभुज बबुत्रा व श्री.



गुरू विठ्ठलनाथ महाराज यांच्या समाधीचा महाअभिषेक पुजारी श्री.समाधान महाराज यांच्या हस्ते होईल.दुपारी २.०० वाजता प्रमुख पाहुणे आमदार आनंदराव पा. बोंढारकर नांदेड दक्षिण,गंगाप्रसाद धोंडीबा काकडे मा.सदस्य जिल्हा परिषद नांदेड,मनोहर पाटील शिंदे सदस्य,जिल्हा परिषद नांदेड,विनय पाटील गिरडे माजी उपमहापौर तथा जिल्हा प्रमुख शिवसेना,साहेबराव पा.सेलुकर उपसरपंच,संजय पा. घोगरे नगरसेवक नांदेड,सतिश पा. बस्वदे प्र.नगरसेवक नांदेड,वैजनाथ देशमुख नगरसेवक नांदेड,राजू लांडगे प्र.नगरसेवक नांदेड,उदय देशमुख प्र.नगरसेवक नांदेड,सौ. सुरेखा प्रदिप लाखे सरपंच गोपाळचावडी,माधव काशिनाथ आंबटवार दलित मित्र महाराष्ट्र शासन,श्रीमती.गिरजाबाई तुळशीराम डाकोरे माजी सरपंच गोपाळचावडी आदिंची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.दुपारी ३ वाजता महाप्रसादास सुरूवात होवून रात्री ७ वाजता गुरू विठ्ठलनाथ महाराज यांच्या पादुका पालखी सोहळा व पालखी सोबत श्री. दत्त भजनी मंडळ गोपाळचावडी गावातील प्रमुख रस्त्याने निघून सांगता गुरू विठ्ठलनाथ महाराज देवस्थान येथे होईल.रात्री ८ वाजता दोन भजनी मंडळाचा कार्यक्रम होईल ज्यामध्ये दत्तकृपा भजनी मंडळ ब्राह्मणवाडा प्रमुख द.भ.प. आनंदराव राजेमोड,गुरुमुर्ती भजनी मंडळ आलेगाव प्रमुख द.भ.प. गोविंदराव पा.मोरे आलेगांवकर. दि.१८ फेब्रुवारी बुधवार रोजी पहाटे ५ वाजता काकडा आरती नंतर सप्ताहाची सांगता होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी नियोजित कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक व मुख्यपुजारी श्री.समाधान तुळशीराम महाराज डाकोरे यांनी केले असून विनीत हे समस्त गावकरी मंडळी गोपाळचावडी ता.जि.नांदेड असे आहेत.

## आंबेगाव तालुक्याच्या विकासासाठी एकत्र काम करण्याचा निर्धार

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ नवनिर्वाचित सदस्यांची आमदार शरददादा सोनवणे यांना भेट

आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव - पेठ जिल्हा परिषद गटाच्या नवनिर्वाचित सदस्या सौ.सुवर्णाताई देविदास दरेकर तसेच कळंब-चांडोली बुद्रुक जिल्हा परिषद गटाच्या नवनिर्वाचित सदस्या सौ.प्रितीताई प्रविण थोरात पाटील यांनी आज किल्ले शिवनेरी, जुन्नरचे आमदार मा.शरददादा सोनवणे यांची भेट घेतली. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, आंबेगाव



तालुक्याच्या सर्वांगीण आणि वेगवान विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी आमदार शरददादा सोनवणे यांनी दोन्ही नवनिर्वाचित सदस्यांचा सन्मान करून त्यांचे अभिनंदन केले. जनतेच्या अपेक्षा आणि विश्वासाला पात्र ठरण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी काम करण्याची ही मोठी संधी असल्याचे त्यांनी सांगितले. घोडेगाव पेठ, कळंब-चांडोली बुद्रुक गटांमध्ये तसेच आंबेगाव तालुक्यात पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य, शेतीपूरक योजना, महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार आणि मूलभूत सुविधा यावर प्राधान्याने काम करण्याचे त्यांनी मार्गदर्शन केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विकासकामांना गती देण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख देविदासजी दरेकर, युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुणभाऊ गिरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजित चव्हाण, शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण थोरात पाटील, पिंपळगाव तर्फे महाळुंगे पंचायत समिती गणाचे शिवसेना उमेदवार मनोहरशेठ इंदोरे, युवासेना तालुकाप्रमुख योगेश थोरात, युवानेते तेजस जाधव, माऊली इंदोरे यांच्यासह आंबेगाव तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाशिवरात्रोत्सव उत्साहात साजरा

मुंबई (दै. संध्या) :

विक्रोळी येथील कन्नमवार नगर परिसरातील शांतीवन येथे महाशिवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शांतीवन परिसरात भारतातील १२ ज्योतिर्लिंगांच्या प्रतिकृती उभारण्यात आल्या होत्या. या प्रतिकृतींचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. संपूर्ण परिसर दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला होता. उत्सवाच्या निमित्ताने शांतीवनच्या सर्वेसर्वा निलिमा दिदी यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. आपल्या मार्गदर्शनात त्या म्हणाल्या की, शिवलिंगावर अभिषेक करताना पडणाऱ्या प्रत्येक थेंबातून ज्ञानाची अनुभूती मिळते. “ज्ञान दगडात नसून ज्योतीस्वरूप परमात्म्यात आहे. शिवलिंग ठोकून बनविलेले नसते, ते स्वयंभू आहे.

परमात्मा एकच असून आपण सर्व त्याची मुले आहोत,” असे त्यांनी अधोरेखित केले. “मेरा बाबा शिवबाबा” या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या कार्यक्रमास नगरसेवक राजेश सोनावळे, माजी नगरसेवक उपेंद्र सावंत, अतिरिक्त कामगार आयुक्त रविराज इळवे, सुजाता रविराज इळवे, डॉ. प्रकाश, प्रभात मित्र मंडळाचे सचिव, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## सुरक्षित व सुरळीत अधिवेशनासाठी यंत्रणा सज्ज

मुंबई (दै. संध्या) :

आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावे यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, तसेच विधानभवन परिसरात शिस्त आणि सुरक्षेला प्राधान्य देऊन गर्दी नियंत्रणासाठी काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. विधानभवन, मुंबई येथे अधिवेशनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. अधिवेशन काळात सुव्यवस्था आणि सुरक्षितता राखण्यासाठी अत्यंत दक्षता घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत सुरक्षा उपाययोजना, वाहनतळ व्यवस्था, अधिवेशन कालावधीत अनुभवी डॉक्टरांची उपलब्धता, वैद्यकीय सुविधा, उपहारगृहातील सेवा व स्वच्छता, खाद्यपदार्थांची तपासणी, विधानभवन परिसरातील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, अखंडित पाणीपुरवठा, दूरध्वनी व इंटरनेट सुविधा, रेल्वे आरक्षण तसेच आपत्कालीन व्यवस्थेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. अधिवेशन काळात अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पर्यायी प्रवेशद्वाराची व्यवस्था करण्यात आली असून प्रवेश नियंत्रण कडक ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

## कोकण विभागीय कार्याध्यक्षपदी 'सुनील झळके' यांची नियुक्ती

भिवंडी (दै. संध्या) :

भिवंडी निजामपूर महानगर पालिकेतील निवृत्त माहिती व जनसंपर्क अधिकारी, सहायक शिक्षण आयुक्त सुनील सुंदराबाई धाऊ झळके यांची ट्रायबल फोरम कोकण विभागाच्या कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.ही नियुक्ती ट्रायबल फोरमचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ऍड. प्रमोद घोडाम यांनी केली आहे.



सुनील झळके महानगरपालिकेमध्ये कार्यरत असतांना महाराष्ट्र शासनाच्या, मराठी भाषा विभागाच्यावतीने जाहीर झालेल्या मराठी भाषा स्पर्धेमध्ये भिवंडी महानगरपालिकेस राज्यामध्ये 'तृतीय क्रमांकाचे पारितोषिक' व रोख १ लाख रुपये रक्कमेचे बक्षीस त्यांच्या प्रयत्नातून त्यांनी महानगरपालिकेस मिळवून दिलेले आहे. झळके हे ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाचे संस्थापक सदस्य,आदिवासी कोळी मल्हार सामाजिक संस्थेचे सदस्य,उपाध्यक्ष, आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, भिवंडी, महाराष्ट्र राज्य पत्रकार परिषद, नाशिक या पत्रकार संघटनेचे ' तालुकाध्यक्ष' आहेत. त्यांनी काही नाटक मालिका व चित्रपटातही भूमिका केलेल्या आहेत. त्यांना आजपर्यंत ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाचा पत्रभुषण, श.ना.नवरे यांच्या कथांवर आधारित एकांकिका लेखन स्पर्धेत राज्यस्तरीय नाट्यदर्पण पुरस्कार,जनजागृती सेवा समिती महाराष्ट्रच्यावतीने समाजरत्न, मुंबई अचीवर्स एक्सलेंस अवॉर्ड, स्टार महाराष्ट्र पुरस्कार आदिंनी सन्मानित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे दैनिक सन्मित्रचे संपादक स्व. स.पा. जोशी यांच्या राज्यव्यापी मराठी चळवळीमध्ये त्यांचा सहभाग होता.तसेच महाराष्ट्र वकील संघटनेचे अध्यक्ष व सर्व सदस्यांसह चळवळीत सहभाग घेऊन कोर्टामध्ये मराठी भाषा वापरात यावी यासाठी ते कार्यरत होते. विविध आदिवासी संघटनांवर पदाधिकारी म्हणून कार्यरत असून आदिवासींसाठी काम करीत आहेत. त्यांची "भाग्यलक्ष्मी" ही कादंबरी सध्या प्रकाशनाच्या मार्गावर असून, त्यांच्या अनेक वर्तमानपत्रात बातम्या, लेख. मुलाखती इ. प्रसिद्ध झालेल्या आहेत.त्यांच्या या निवडीने कोकण विभागातील विविध क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांच्यावर निवडीबाबत आनंद व्यक्त केला आहे.

## एएम/ एनएस इंडियाने मूल्यवर्धित स्टील पोर्टफोलिओचा केला विस्तार

मुंबई/दिल्ली (दै. संध्या) :

आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/ एनएस इंडिया) ने आज अप्लायन्स आणि इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टिममधील ‘ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चर्स’ (ओईएमएस)च्या वाढत्या डिझाइन-प्रणीत गरजा पूर्ण करण्यासाठी ‘एएम/ एनएस व्हायब्रन्स’ आणि ‘एएम/ एनएस ऑप्टिमा’ - ह्या दोन जागतिक दर्जाच्या, प्रीमियम ब्रँडेड स्टील सोल्यूशन्ससह त्यांच्या मूल्यवर्धित पोर्टफोलिओला मजबूत बनवण्याची घोषणा केली. पृष्ठभागाची सुसंगत गुणवत्ता, कडक सहनशीलता आणि मोठ्या प्रमाणात विश्वासार्ह कामगिरी ह्यांचा मेळ घालणाऱ्या स्टीलच्या वाढत्या मागणीसह, ‘एएम/ एनएस इंडिया’ त्यांचा मूल्यवर्धित पोर्टफोलिओ ब्रँडेड ऑफरिंग्जसह वाढवत आहे,ज्या प्रीमियम, आंतरराष्ट्रीय स्तरावर बेंचमार्क केलेली गुणवत्ता देशांतर्गत उपलब्ध करून देताना आयातीवरील अवलंबित्व कमी करतात.ह्या दोन ब्रँडेड कोटेड ऑफरिंग्ज आता मूल्यवर्धित उत्पादन पोर्टफोलिओचा भाग आहेत, ज्यामध्ये Optigal® Magnelis®, Optigal® Prime, Optigal® Pinnac आणि इतर ह्यांचा समावेश आहे -ज्यातील प्रत्येक विविध ॲप्लिकेशन्समधील सुसंगतता, कार्यक्षमता आणि टिकाऊपणासाठी प्रमाणित आहे.

श्री रंजन धर ,आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/ एनएस इंडिया) चे डायरेक्टर आणि व्हाइस प्रेसिडेंट - सेल्स अँड मार्केटिंग, ह्यासंदर्भात बोलताना म्हणाले: “अचूक उत्पादन आणि सुसंगत ब्रँड गुणवत्तेवर लक्ष केंद्रित केलेल्या ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चर्स (ओईएम) साठी ; सामग्रीची निवड ही उत्पादकता,खर्च आणि दीर्घकालीन कामगिरीवर थेट परिणाम करते.


महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई - निविदा सूचना**

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून **T-124/2025-26 ते T-127/2025-26 साठी** ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर **(https://etender.mahadiscom.in/eat.App) दि. 17.02.2026 ते 23.02.2026. पर्यंत सकाळी 13.00 वाजेपर्यंत** उपलब्ध आहेत. तसेच **निविदा दि. 23.02.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील. सदर निविदा **दि. 23.02.2026 रोजी 15.30 वाजता** शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे **भ्रमणध्वनी क्र. 7875767824 वर संपर्क साधावा.** निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील ""Announcements"" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता (स्था),**
**स्थापत्य विभाग, पुणे**

PRO No. PZ- 236 /2025-26


## भोईर कुळ मेळावा उत्साहात संपन्न

भिवंडी (दै. संध्या) :

डहाणू तालुक्यातील रानशेत (भोईर पाडा) येथे नुकताच आदिवासी भोईर कुळ मेळावा अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. मेळाव्याची सुरुवात भोईर कुळ देवाच्या दर्शनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित बांधवांची नावनोंदणी, तसेच गावानुसार स्वागत व ओळख कार्यक्रम पार पडला. इच्छुक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत भोईर कुळाची एकता, परंपरा आणि आदिवासी संस्कृती जपण्याचे आवाहन केले. मेळाव्यात मुला-मुलींच्या सांस्कृतिक नृत्य सादरीकरणाने वातावरण रंगून गेले. ढोल व तारप्याच्या तालावर सामूहिक आदिवासी नृत्य (आडवे तूर) करण्यात आले. हिरवा देव, हिमाय, वाघोबा व नारान देव यांच्या स्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. आदिवासी कलाकार दिनेश भोईर यांनी सिने कलाकारांच्या आवाजात मिमिक्री सादर करून उपस्थितांना मनमुराद हसवले. देव बांधणीसाठी मोलाचे योगदान



दिल्याबद्दल शिवराम भोईर, सखाराम भोईर, वसंत भोईर, कान्हा भोईर व लक्ष्मण भोईर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दुपारी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व बांधवांनी एकत्र बसून भोजनाचा आनंद घेत सामाजिक एकतेचा संदेश दिला. हा मेळावा केवळ नाच-गाण्यापुरता मर्यादित न राहता, भोईर कुळाची ओळख, इतिहास व आदिवासी संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणारा महत्वपूर्ण उपक्रम ठरला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर भोईर, दिनेश भोईर व परशुराम भोईर यांनी केले, तर मेळाव्यासाठी वर्गणी दिलेल्या सर्व बांधवांचे आभार राजेश भोईर यांनी मानले.


**पुणे महानगरपालिका, पुणे**

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा

पुणे — अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दिनांक : दि. १७/०२/२०२६ ते दि. २४/०२/२०२६ दुपारी ०२:३० पर्यंत

स्वीकृती दिनांक : दि. १७/०२/२०२६ ते दि. २४/०२/२०२६ दुपारी ०२:३० पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २५/०२/२०२६ दु. ३.०० वा

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ELECTRICAL/2025/389 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे बावधन येथे असलेले प्राण्यांचे इन्सिनेटर बोपोडी STP परिसरात स्थलांतरित करणे. | 1359.00 | 3331458.00 | 33315.00 | 8 महिने | श्री. मंगेश मिसाळ 9689987447 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/१७१४ दि. १६/०२/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ज्ञानेश्वर उर्फ माऊली मोरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलच्या शहराध्यक्षपदी निवड

पिंपरी (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहर सेवादल अध्यक्षपदी ज्ञानेश्वर उर्फ माऊली मोरे यांची नुकतीच निवड करण्यात आली. पक्षाच्या नेत्या तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते त्यांना निवडीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले. ज्ञानेश्वर उर्फ माऊली मोरे हे पक्ष स्थापनेपासून सक्रियपणे कार्यरत असून त्यांनी पक्षातील विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. मागील नऊ वर्षांपासून ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे शहर फेरीवाला समिती सदस्य म्हणून कार्यरत होते. पक्षातील विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी अजित पवार यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. नियुक्तीनंतर बोलताना मोरे म्हणाले की, शहराध्यक्ष पदाची जबाबदारी पार पाडताना पिंपरी-चिंचवड शहराची कार्यकारिणी राज्यातील सर्वात मोठी आणि कार्यक्षम करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील. तसेच सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट करण्यासाठी आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विकासदृष्टिकोनाची पूर्तता करण्यासाठी कटिबद्ध राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मोरे यांच्या निवडीबद्दल पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या नेतृत्वाखाली शहरात पक्षसंघटना अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### रस्ता चुकलेल्या 11 जणांची शिवदुर्ग रेस्क्यू टीमच्या मदतीने सुखरुप सुटका

लोणावळा (दैनिक संध्या) : विसापूर गडावर रविवारी (दि.१५) दुपारी सुमारे ३ वाजता फिरायला गेलेले ११ जण रस्ता चुकल्यामुळे भरकटत राहिले. यावेळी शिवदुर्ग मित्र लोणावळा रेस्क्यू टीमने तत्पर मदत केल्यामुळे सर्वांची सुखरूप सुटका केली. विसापूर गडावर एक ग्रुप रस्ता चुकल्याची माहिती संतोष शेलार यांना मिळाली होती. संबंधितांचा फोन नंबर व लोकेशन घेतल्यानंतर तत्काळ शिवदुर्ग मित्र लोणावळा रेस्क्यू ग्रुपवर संदेश पाठवण्यात आला. यानंतर सागर कुंभार, राहुल वाघमारे, अनिल मरगळे यांनी तातडीने घटनास्थळी रवाना होत मदतकार्य सुरू केले. तसेच, पुरातत्व विभागाचे कर्मचारी रोहित नगिने हेदेखील गडावरून मदतीसाठी पुढे सरसावले. अल्पावधीतच रेस्क्यू पथक रस्ता चुकलेल्या तरुणांपर्यंत पोहोचले. एकूण ११ जणांचा हा ग्रुप गडावर चुकीच्या वाटेने गेल्याने अडचणीत सापडला होता. संयमाने मार्गदर्शन करत आणि सुरक्षित वाट दाखवत सायंकाळी सुमारे सहा वाजता सर्वांना सुखरूपपणे पाटण गावात आणण्यात आले.

### चेन चोरीच्या घटनांमध्ये घट : नियोजन प्रभावी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात मागील काही वर्षात सोनसाखळी चोरट्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला होता. सकाळ-संध्याकाळ महिलांना लक्ष्य करून दागिने हिसकावण्याच्या घटना सातत्याने घडत होत्या; मात्र त्यानंतर टप्प्याटप्प्याने या घटनांमध्ये घट झाली आहे. यामागे पिंपरी-चिंचवड पोलिसांचे सुक्ष्म नियोजन आणि कठोर अंमलबजावणी कारणीभूत ठरल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. चेन स्नॅचिंग रोखण्यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईसोबतच शहरातून बाहेर पडणाऱ्या प्रमुख रस्त्यांवर दररोज सकाळ व सायंकाळ अशा दोन सत्रांत नाकाबंदी सुरू केली. विशेष म्हणजे, चेन स्नॅचिंग 'हॉटस्पॉट' पॉइंट वेगळे निश्चित करून त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यात आले. स्थानिक पोलिसांसह वाहतूक पोलिसांचा सक्रिय सहभाग या मोहिमेत आहे. नाकाबंदी लागल्यानंतर संबंधित पोलिस ठाण्याकडून मुख्य नियंत्रण कक्षाला (मेन कंट्रोल रूम) वायरलेसवरून माहिती दिली जाते. नियंत्रण कक्षाकडून वेळोवेळी अद्ययावत माहिती घेतली जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून देण्यात आली असून, कोणता अधिकारी कधी आणि कोणत्या नाकाबंदी ठिकाणी भेट देणार, याचे वेळापत्रक पोलिस आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आले आहे. गुन्हे शाखेकडून प्रत्येक नाकाबंदीसाठी एक पोलिस अधिकारी व दोन पोलिस अंमलदार नियुक्त केले जातात. संबंधित पोलिस ठाण्यांकडून बॅरिकेड, दोर, लाठी व रजिस्टरची व्यवस्था केली जाते. तपासणीदरम्यान वाहनांची सविस्तर नोंद रजिस्टरमध्ये करण्यात येते. वाहतूक शाखेकडील प्रभारी अधिकारी प्रत्येक पॉईंटवर चलन मशीनसह एक वाहतूक अंमलदार नियुक्त करतात.

### 50 टक्के मान्यताप्राप्त प्राध्यापक अनिवार्य

पुणे (दैनिक संध्या) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये नियमित आणि तदर्थ स्वरूपात नियुक्त झालेले आणि विद्यापीठाची मान्यता असलेले एकत्रितपणे किमान 50 टक्के शिक्षक असणे आवश्यक आहे. त्यासाठी येत्या 31 मार्चची मुदत देण्यात आली आहे. मुदतीत प्राध्यापक भरती न झाल्यास परिसंस्थेमधील संबंधित अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष 2026-2027 मधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय घेण्यात येईल, असा इशारा विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रदीप कोळी यांनी संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिला आहे. कोळी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील कलम 108 (1) (च) मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, अर्हता, सेवेच्या अटी व शर्ती तसेच वित्तलब्धी, या विद्यापीठाने व राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे असणे आणि त्या अभ्यास पाठ्यक्रम, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन यांच्याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असणे, ही संलग्नीकरण तसेच मान्यता यांकरिताची अट असून, त्याचे अनुपालन करणे संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक आहे.

### कांदा आणि भाजीपाला भाव वाढले

पिंपरी (दैनिक संध्या) : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांद्याची मोठी आवक झाली. कोबी, भेंडी, रताळे, गवार, कांदा, वांगी, शेवगा, वाटाणा, हिरवी मिरचीची देखील भरपूर आवक झाली. लसणाचे भाव कडाडले. पालेभाज्यांच्या बाजारात कोथिंबीर, पालक व मेथीची आवक वाढल्याने भाव गडगडले. एकूण उलाढाल 6 कोटी 10 लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची आवक मागील आठवड्याच्या तुलनेत वाढली. कांद्याची एकूण 9 हजार क्विंटल आवक झाली. कांद्याला कमालभाव 1,500 रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक 2,500 क्विंटल झाली. बटाट्याला 1,300 रुपयांपर्यंत भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक 250 क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला 7 हजार रुपयांपासून ते 9,000 रुपयांपर्यंत भाव मिळाला. टोमॅटो- 350 क्विंटल (800 ते 1,400), कोबी- 225 क्विंटल (600 ते 1,000), फ्लॉवर- 190 क्विंटल (1,000 ते 1,600).

# भाजपचे सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

**पिंपरी (दै. संध्या) :**




काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान केल्याच्या निषेधार्थ आज भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने पिंपरी चौकात आक्रमक आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारून आपला संताप व्यक्त केला आणि त्यांच्या हकालपट्टीची जोरदार मागणी केली.

शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आमदार उमा खापरे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, सरचिटणीस वैशाली खाडये, माजी नगरसेवक राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव आणि मंडलाध्यक्ष मंगेश धाडगे यांनी आपल्या भाषणातून सपकाळ यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला.

"छत्रपती शिवराय हे आमचे आराध्य दैवत आहेत, त्यांची तुलना धर्मांध टिपू सुलतानशी करणे हे ऐतिहासिक अज्ञान असून असा अपमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही.छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा अवमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेशी निगडित असलेल्या या विषयावर आम्ही ठाम आहोत. संबंधितांकडून तात्काळ माफी आणि योग्य ती कारवाई झाली नाही, तर जनतेच्या भावनांचा सन्मान राखण्यासाठी आम्ही लोकशाही मार्गाने अधिक तीव्र आंदोलन उभारू. शिवरायांचा सन्मान अबाधित ठेवणे हीच आमची भूमिका आणि बांधिलकी आहे," असा इशारा यावेळी वक्त्यांनी दिला.

याप्रसंगी हरीश मोरे,युवराज लांडे, देविदास साबळे, कैलास सानप,खंडूदेव काठारे,सतीश नागरगोजे, दिपक नागरगोजे,गणेश ढाकणे,देवदत्त लांडे, डॉ. हेमंत देवकुळे आणि हेमचंद्र मासुळकर यांचीही भाषणे झाली. आंदोलनात या प्रसंगी विधान परिषद आमदार उमाताई खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, दक्षिण भारत आघाडीचे प्रदेश संयोजक राजेश पिल्ले,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,जिल्हा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, वैशाली खाड्ये, मधुकर बच्चे, नगरसेवक अनुराधा गोरखे, विजय उर्फ शीतल शिंदे, सागर गवळी, राजू मिसाळ, डॉ.सुहास कांबळे, कोषाध्यक्ष राजाभाऊ मासुळकर, प्रवक्ते कुणाल लांडगे, राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, मंडल अध्यक्ष मंगेश धाडगे, मोहन राऊत, अनिता वाळूंजकर, अजित कुलथे, विजय शिनकर, मनोज ब्राह्मणकर, गणेश ढाकणे, देवदत्त लांडे, खंडू कठारे, कैलास सानप, मनीष पंजाबी, युवराज लांडे, सतपाल गोयल, देविदास साबळे, नंदू कदम, दीपक नागरगोजे, युवराज ढोरे, सतीश नागरगोजे, बिभीषण चौधरी, नेताजी शिंदे, हरीश मोरे, दिलीप गडदे, शिवदास हांडे, संतोष टोणगे, हेमंत देवकुळे, सचिन उदागे, रवींद्र सानप, रोहित मोखा, सुमित घाटे,राहुल खाडे, साची दोशी, प्रतीक रामगुडे, साईराज भालेकर, ऋषी भालेकर, गोपाल मंडल, दिनेश काटे, मनोज घोडेकर, अभिजित बागुल, आदम मुलाणी, अजय मोरे, उमेश सांडभोर, गौरव शिरुडे, प्रज्योतसिंग हंस, वैभव लंभाते, वरद अंबिके, सुधीर साळूंखे, मयुर काळभोर, जालिंदर काटे, विजय दळवी, ओमकार पवार,निखिल सहाने,संजय परळीकर तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते."सपकाळ यांना पदावरून बडतर्फ करा," अशा घोषणांनी संपूर्ण पिंपरी चौक परिसर दणाणून गेला होता.

## पिंपरी-चिंचवडमध्ये ७ नवीन स्वस्त धान्य दुकाने सुरु

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड शहरात अखेर सात नवी स्वस्त धान्य दुकाने सुरु करण्यात आली आहेत. फेब्रुवारी महिन्यापासून या दुकानांतून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष धान्य वाटप सुरु करण्यात आले आहे. त्याबाबतची प्रक्रिया अन्न पुरवठा विभागाने पूर्ण केली आहे. दरम्यान, या सात दुकानांना नजीकच्या दुकानांतील शिधापत्रिकाधारक जोडून देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या दुकानांचा कारभार थेट महिला बचत गटांकडे सोपविण्यात आला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत महत्त्वाचा दुवा म्हणून या सात दुकानांचा कारभार हा महिला बचत गटाकडे देण्यात आला आहे. सध्या शहरात महिला बचत गटांकडून 28 स्वस्त धान्य दुकानांची व्यवस्था पाहिली जात आहे. त्यामध्ये आता नव्याने सात दुकानांची भर पडणार आहे. महिला सक्षमीकरणासोबतच रेशन वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता वाढेल, अशी अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली आहे. या नवीन दुकानांमुळे लाभार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. घराजवळच स्वस्त धान्य मिळणार असून, लाभार्थ्यांची गैरसोय टळेल, अशी माहिती पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. या दुकानांची पाहणी करुन तसेच, संबंधित दुकानांच्या मशिनवर धान्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. दरम्यान, नागरिकांनी या दुकानांतून धान्य घेण्याबाबत आवाहन करण्यात आले आहेत. तसेच, काही तक्रार आल्यास त्याची दखल घेतली जाईल. असे अन्न पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## प्राधिकरणात गंगा आरती व गंगाकलश स्नान उत्साहात संपन्न

**निगडी (दै. संध्या) :**





महाशिवरात्रीनिमित्त श्री केदारेश्वर मंदिर प्रांगण, पेठ क्रमांक २४, लोकमान्य हॉस्पिटलच्या मागे, निगडी प्राधिकरण येथे रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी गंगा आरती आणि गंगाकलश स्नान शिवभक्तांच्या साक्षीने भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमाला विधानपरिषद उपसभापती अण्णा बनसोडे, नगरसेविका शैलजा मोरे, सामाजिक कार्यकर्त्या वर्षा देशपांडे, श्री केदारेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजू मोरे तसेच सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत उर्फ बाळा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

काशी विश्वेश्वर येथील विद्वान पंडित हिमांशू पांडे आणि गगन भार्गव यांच्या पौरोहित्यानुसार सायंकाळी ७.१५ वाजता गंगा आरती तर रात्री ८.०० वाजता गंगाकलश स्नान विधी पार पडला. शंखनाद व घंटानादाच्या मंगल ध्वनीत श्रीगणेश पूजन, शिवस्तुती, शिवस्तवन तसेच धूप, दीप व कर्पूर आरतीने श्री केदारेश्वराची महाआरती करण्यात आली. उपस्थित भाविकांनी पुष्पवृष्टी करत हर हर महादेवच्या जयघोषात परिसर दुमदुमून सोडला. महाशिवरात्री २०२६ महोत्सवानिमित्त रविवारी पहाटे ५ वाजल्यापासून सोमवारी पहाटे ५ वाजेपर्यंत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ५.३० वाजता रुद्राभिषेक, सकाळी ७.३० वाजता बागलकोट कृष्णशिला इच्छाधारी नागधाम प्राणप्रतिष्ठापना व श्रीफळ जलअभिषेक, सकाळी ८.०० वाजता आरती संपन्न झाली. सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत रक्तदान शिबिर तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

दुपारी १२.०० वाजता पवनसुत भजनी मंडळाचे भक्तीभजन, दुपारी ३.०० वाजता स्वामी प्रतिष्ठान भजनी मंडळाचे स्वरभजन सादर झाले. दुपारी ४.३० वाजता शिवकालीन युद्धकला प्रशिक्षणांतर्गत लाठीकाठी व दांडपट्टा यांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सायंकाळी ५.३० वाजता कलारंजनी संगीत विद्यालयाच्या वतीने 'सत्यम् शिवम् सुंदरा' हा भावगीतांचा कार्यक्रम सादर झाला. रात्री ८.१५ वाजता स्थानिक कलाकारांनी भक्ती संगीतमालेतून वातावरण अधिक भक्तिमय केले. रात्री ११.०० वाजल्यापासून पहाटे ५.०० वाजेपर्यंत महाशिवरात्र जागरण करण्यात आले. चार प्रहर पूजेनंतर महोत्सवाचा समारोप झाला. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय मोरे यांनी केले, तर बाळा शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## वडगाव मावळ–लोणावळ्यात महाशिवरात्र भक्तिभावात साजरी

**पिंपरी (दै. संध्या) :**





वडगावचे ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज व सांगवीचे ग्रामदैवत श्री जाखमाता देवी यांचा महाशिवरात्रीनिमित्त होणारा पारंपरिक भाऊ-बहीण भेटीचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. पोटोबा महाराज व श्री जाखमाता देवी यांचे बहीण-भावाचे नाते मानले जाते. दरवर्षी पोटोबा महाराजांची पालखी महाशिवरात्रीला सांगवी येथे इंद्रायणी नदीकाठी असलेल्या जाखमाता देवीच्या भेटीसाठी नेली जाते. ही परंपरा जुन्या काळापासून सुरू आहे. आजही पोटोबा महाराजांची पालखी भजन, अभंग म्हणत जाखमाता देवीच्या भेटीला गेली. या वेळी सांगवी ग्रामस्थांनी पालखीचे उत्साहात स्वागत केले. देवस्थानचे विश्वस्त व सांगवी ग्रामस्थांच्या हस्ते इंद्रायणी नदीमध्ये पोटोबा महाराजांच्या मूर्तीस स्नान घातल्यानंतर पोटोबा महाराज व जाखमाता देवीची भेट घडविण्यात आली. तसेच, देवीची साडी-चोळीसह ओटी भरण्यात आली. दरवर्षी महाशिवरात्रीच्यानिमित्ताने होणारी ही भेट पारंपरिक भेट मानली जात असून, पालखी नदीवर जाताना व येताना नागरिकांनी ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करून दर्शनाचा लाभ घेतला. या वेळी पोटोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त किरण भिलारे, उपाध्यक्ष गणेश ढोरे, विश्वस्त चंद्रकांत ढोरे, तुकाराम काटे, अरुण चव्हाण, सुभाषराव जाधव, भास्करराव म्हाळसकर, विणेकरी बबनराव भिलारे, पंढरीनाथ भिलारे, महादू खांदवे, बारकू खांदवे, विठ्ठलराव ढोरे, मधुकर पानसरे, शंकरराव पगडे, सोमनाथ काळे, अनिल कोद्रे, पुजारी अशोक गुरव, शरद गुरव, कैलास खांदवे, रवींद्र म्हाळसकर, नारायण ढोरे, दिनेश तुमकर, सोपान आगळमे, मधुकर टकले, रवींद्र तुमकर, योगेश ढोरे, भाऊसाहेब ढोरे, बाळासाहेब तुमकर, मृदंगमणी आढारी आदी उपस्थित होते.

## महाशिवरात्रीमुळे पालेभाज्यांचे दर स्थिर; तर शेवगा कोलमडला

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवार (दि. 15) रोजी बाजारात महाशिवरात्रीमुळे पालेभाज्यांना मागणी नसल्याने दर स्थिर होते. वाटाणा गाजर यांचे दर 30 ते 40 रूपये प्रतिकिलो होते. इतके दिवस तेजीत असणाऱ्या गवार आणि शेवगा यांचे दर काहीसे कमी झाले आहेत. गवार 120 रूपये किलो, शेवगा 120, वाटाणा 30, टोमॅटो 25, भेंडी 70, फ्लॉवर 40, कोबी 30, मिरची 60, गाजर 30, शिमला 50, लसूण 180 - 200 रूपये, आले 60 रूपये, वांगी 40, काकडी 30, कारले 60, कांदे 20 - 25 रूपये किलो, बटाटा 25- 30 रूपये किलो, बिन्स 50 रूपये किलो, पावटा 60, लाल भोपळा 30, घोसाळी 60, दोडका 50, तोंडली 90 रूपये, बीट 30, दुधी 50, घेवडा 50 रूपये किलो दराने विक्री केली जात आहे.

कोथिंबीर 25 रूपये, मेथी 25 रूपये, पालक 25 रूपये, शेपू 25 रूपये, राजगिरा 20, पुदिना 10 रूपये, मुळा 25 रूपये, चवळई 20, लाल माठ 20, कांदापात 20 रूपये, करडई 20, आळू पाने 10 रूपये जुडी, चुका 20 रूपये.

# पिंपरी-चिंचवडमध्ये कामगार न्यायालयाची मागणी जोर धरतेय

### औद्योगिक वाद, प्रलंबित खटले आणि वाढती कामगार संख्या; स्थानिक न्यायालयामुळे वेळ व खर्चाची बचत होणार



पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर आहे. त्यामुळे येथे कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. औद्योगिक वादांचे निराकरण स्थानिक स्तरावर झाल्यास कामगार आणि व्यवस्थापन दोघांनाही फायदा होईल. कामगारांच्या तक्रारी लवकर निकाली निघाल्या, तर औद्योगिक शांतता राखली जाईल आणि शहराच्या आर्थिक प्रगतीस गती मिळेल. त्यामुळे शहरात हे न्यायालय होणे महत्त्वाचे आहे. **- ॲड. सोपानराव माने, ज्येष्ठ विधीज्ञ**

**प्रलंबित खटल्यांचा वाढता बोजा**

- पुणे येथील कामागार न्यायालयात पिंपरी-चिंचवडमधील शेकडो प्रकरणे प्रलंबित
- कामगारांना सुनावणीसाठी वारंवार गाठावे लागते पुणे
- कामगारांना आर्थिक त्रास
- उद्योग व्यवस्थापनालाही न्यायालयीन कारवाईसाठी संसाधने खर्ची
- शहरात कामागार न्यायालयाची गरज का ?
- न्याय प्रक्रियेतील विलंब दूर करण्यासाठी
- शहरात कामगार न्यायालय सुरु झाल्यास वेळ, पैसा अन् श्रमांची बचत

**पिंपरी (दै. संध्या) :**

तीस लाखांहून अधिक लोकसंख्या आणि औद्योगिक ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात आता कामगार न्यायालय सुरू करण्याची मागणी होत आहे. शहरात हजारो उद्योगधंद्यांमध्ये लाखो कामगार कार्यरत असून, त्यांना कामाच्या ठिकाणी उद्भवणाऱ्या तक्रारी, वाद आणि अन्यायकारक कामकाजाविरुद्ध न्याय मिळवण्यासाठी पुणे येथे धाव घ्यावी लागते. या प्रक्रियेत वेळ, पैसा आणि श्रमांचा अपव्यय होत असल्याने शहरात कामगार न्यायालय सुरू करण्याची गरज तीव्रतेने व्यक्त होत आहे.

पिंपरी-चिंचवड हे महाराष्ट्रातील सर्वाधिक औद्योगिक घनता असलेले शहर मानले जाते. ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, फूड प्रोसेसिंग, मशिनरी, केमिकल्स आदी उद्योगांत मोठ्या प्रमाणावर कामगार कार्यरत आहेत. कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात उद्भवणारे वाद, सेवासंबंधी तक्रारी किंवा कायदेशीर वाद सोडवण्यासाठी सध्या पुण्यातील लेबर कोर्टात जावे लागते. परंतु, पुणे न्यायालयातील प्रकरणांची संख्या मोठी असल्याने, पिंपरी-चिंचवडमधील खटल्यांचे निराकरण वर्षानुवर्षे लांबते, अशी परिस्थिती आहे.

कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील वाद वेळेत सोडवले गेले, तर औद्योगिक वातावरण शांत आणि उत्पादक राहील. यामुळे शहराच्या औद्योगिक विकासालाही चालना मिळेल.

शहरात हजारो लघू आणि मध्यम उद्योग (एमएसएमइ) आहेत. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना आपले हक्क प्रभावीपणे मांडता यावेत, म्हणून स्थानिक न्यायव्यवस्था आवश्यक आहे.

अलीकडेच पिंपरी-चिंचवड शहरात जिल्हा व सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालय सुरू झाले आहे. त्यामुळे आता कामगार न्यायालयाची मागणी होऊ लागली आहे. शहरातील वकील, नागरिक आणि कामगार संघटनांनीही शासनाकडे कामगार न्यायालय स्थापन करण्याची औपचारिक मागणी केली आहे.

औद्योगिक परिसर : चाकण, भोसरी, पिंपरी, चिंचवड, तळेगाव, ताथवडे आदी भाग हा औद्योगिक परिसर म्हणून ओळखला जातो.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाविस्तार एआय ॲप नोंदणीकरिता शेंडकरवाडी येथे शिबीर संपन्न

बारामती (दैनिक संध्या) : उपविभागीय कृषी अधिकारी, बारामती व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्यावतीने तालुक्यात 'महाविस्तार एआय' ॲप नोंदणी मोहीम अभियान राबविण्यात येत असून शेंडकरवाडी येथे रविवारी (दि.१५) विशेष शिबाराचे आयोजन करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी सचिन हाके, मंडळ कृषी अधिकारी आप्पासाहेब झंजे, उपकृषी अधिकारी प्रविण माने, शेतकरी बांधव उपस्थित होते. श्री. हाके यांनी 'महाविस्तार एआय' ॲप डाउनलोड करण्याची प्रक्रिया, त्याचा प्रभावी वापर व शेतकऱ्यांना होणारे फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.या ॲपमूळे कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल होत असून शेतकरी आधुनिक शेतीकडे वाटचाल करीत आहे, त्यामुळे शेतकरी बांधवानी प्ले स्टोर वर जाऊन Mahvistar AI app यावर क्लिक 'एआय ॲप' डाऊनलोड करुन घ्यावे ,असे आवाहन श्री. हाके यांनी केले. श्री. बोराटे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना, ॲप बाबत माहिती दिली. श्री. झंजे यांनी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.



### वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न; समाजरत्न, कलारत्न, शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मान

जेजुरी (दैनिक संध्या) : जयमल्हार ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे निरा-पिंपरे ता.पुरंदर येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मान्यवरांना समाजरत्न,कलारत्न,शिक्षणरत्न हे विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात चित्रपटनिर्माते दिग्दर्शक प्रकाश पांचाळ यांना मार्तंड कलारत्न पुरस्कार तसेच बालाजी मित्र मंडळ ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जयवंत जाधव यांना मार्तंड समाज रत्न पुरस्कार तर सेवा निवृत्त विज्ञान शिकाधक अशोक टाळकुटे यांना मार्तंड आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सन अँड ओशन ग्रुपचे व्यवस्थापकीय संस्थापक राजकुमार धुरगुडे होते. विजयकुमार हरिश्चंद्रे,पंचायत समितीच्या सदस्या स्मिता निगडे,संतोष निगडे,कांचन निगडे,अजित निगडे,संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे,सचिव नीता खोमणे,मुख्याध्यापिका सुषमा भुंजे,संचालक सुदर्शन जैन,संजय मदने, मिलिंद केंडे सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे,अमोल साबळे,जयजित खोमणे आदीं उपस्थित होते. सायंटिफिक ऑफिसर तेजल खोमणे,अभिषेक दरेकर,उत्कृष्ट मेक अप आर्टिस्ट अमर झेंडे आणि कोरिओग्राफर योगेश ननावरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाचा केलेला वध यावर विशेष प्रकाश झोत टाकण्यात आलेला देखावा सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपाली शितोळे आणि मनिषा धायगुडे यांनी केले.कार्यक्रमाचे नियोजन शिक्षक वर्गाने केले.



### गणेशभाऊ बोत्रे यांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची संधी द्या : ग्रामस्थांची मागणी

चाकण (दैनिक संध्या) : उद्योग पंढरीचे नाक असलेल्या चाकण एमआयडीसीतील, खेड तालुक्यातील नाणेकरवाडी महाळुंगे इंगळे जिल्हा परिषद गटात जोरदार मुसंडी मारून विजयश्री खेचून आणलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार गणेशभाऊ कांताराम बोत्रे यांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची संधी देण्याची जोरदार मागणी खालुंब्रे ग्रामस्थांनी केली आहे. खेड तालुक्यातील खालूंब्रे येथे समस्त ग्रामस्थ व शांतीदुत तरुण मंडळाच्या वतीने गणेशभाऊ बोत्रे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस विशालभाऊ तुळवे व सामाजिक कार्यकर्त्या शुभांगीताई तुळवे यांच्या हस्ते नागरी सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी ही मागणी केली. याप्रसंगी खालूंब्रे गावचे माजी उपसरपंच विकास तुळवे, माजी सरपंच कमल तुळवे, पोलीस पाटील वंदना तुळवे, सदस्या सुचेता बोत्रे, माजी सरपंच शोभा गाडे, मंगल तुळवे, भाग्यश्री तुळवे, राधा तुळवे, आशाबाई तावरे, कुंदा तावरे, हरणाबाई तुळवे, रेखा तुळवे, छाया तुळवे, नंदा तुळवे, सारिका तुळवे, शुभांगी तुळवे, मंदाकिनी तुळवे, रसिका ओव्हाळ, ऋतुजा ओव्हाळ, शाहूबाई तुळवे, दिनकर तुळवे, संतोष तुळवे, अनिल घनवट, सक्षम तुळवे, ओम तुळवे, ऋषी वाघमारे, मारुती तुळवे, रामदास तुळवे, रविंद्र तुळवे, सिद्धार्थ तुळवे, प्रशांत तुळवे, ईश्वर तुळवे, गणेश तुळवे, दादा तावरे, गौरव तुळवे, शिवाजी बोत्रे, सार्थक तुळवे, सार्थक ओव्हाळ, सिंघम तुळवे आदी उपस्थित होते. पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घवघवीत आणि उत्तुंग यश मिळवत सत्तेसाठी स्पष्ट बहुमत प्राप्त केल्याने अध्यक्षपदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गणेश बोत्रे यांच्या रूपाने खेड तालुक्याला आणि तालुक्याच्या पश्चिम पट्ट्याला अध्यक्ष पदाची संधी मिळावी अशी मागणी खालूंब्रे ग्रामस्थ व खेड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी केली आहे. विशालभाऊ तुळवे यांनी यावेळी सांगितले की," खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशभाऊ बोत्रे यांनी या भागात विकास कामांचा आलेख उंचावता ठेवला आहे. प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असलेल्या बोत्रे यांच्या रूपाने तालुक्याला अध्यक्ष पदाची संधी मिळणे गरजेचे आहे."

# अविचाराने पळून जाणाऱ्या मुलींनी आपले जीवन बरबाद केले

**विलास बडे : भिगवण येथील राजमाता जिजाऊ व्याख्यानमाला**

भिगवण (दै. संध्या)

तुम्ही-आम्ही सर्व आज जीवन चक्रव्यूहात अडकलेलो आहोत. त्यातून बाहेर पडायचे असेल, तर हा चक्रव्यूह आपणास फोडावा लागेल. त्याकरिता बाह्य जगताशी जास्त संबंधित न राहता पद, प्रतिष्ठा, पैसा, समाजाने केलेलं तुमचं मूल्यांकन या ऐवजी अंतर्मनाशी संबंधित राहून किमान अर्धा तास जरी स्वतःशी हितगुज साधली तसेच जीवनात प्रतिष्ठा, अपेक्षा, जग काय म्हणेल? यापेक्षा संयम व समाधानाने जगले तर जीवन अधिक सुंदर व समृद्ध होऊ शकते, असे मत न्यूज १८ मराठी वाहिनीचे पत्रकार व न्यूज अँकर विलास बडे यांनी व्यक्त केले. भिगवण येथील अखिल भारतीय मराठा महासंघ व छत्रपती शिवराय सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त भिगवण येथे सुरू असलेल्या राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेतील व्दितीय पुष्प अर्पण करताना 'जीवन चक्रव्यूहातील आजचा अभिमन्यू' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जेष्ठ नेते प्रदीप गारटकर, महाराष्ट्र प्रदेश भाजपचे विशेष निमंत्रित सदस्य मारूतीराव वणवे, प्रायोजक प्रतिनिधी स्वामी चिंचोली येथील दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, बारामती येथील गिरीराज हॉस्पिटलचे डॉ. रमेश भोईटे, राजेगाव येथील राजनाथ दूध संकलन व शीतकरण केंद्राचे चेअरमन व दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भारत खराडे तसेच राजेगाव येथील सार्थक डेअरी, सार्थक रोडलाईन्स, सार्थक फर्टीलायझर चे लक्ष्मण ठेंबरे उपस्थित होते.

मुला मुलींच्या आजच्या वर्तनुकीबाबत बोलताना बडे म्हणाले की, मुलींनी पळून जाण्याला माझा विरोध नाही. पण, सोबत एक विज्ञानाचे, एक भूगोलाचे, एक गणिताचे आणि एक दोन महामानवांच्या चरित्राचे एक एक पुस्तक घेऊन पळून जा. अशी पुस्तके घेऊन पळून गेलेल्या मुली चंद्रावर गेल्या आणि अविचाराने पळून जाणाऱ्या मुलींनी आपले जीवन बरबाद केले. महाभारतातील अभिमन्यूला चक्रव्यूहातून बाहेर कसे पडावे? हे माहीत नव्हते, परंतु आजच्या अभिमन्यूला चक्रविवाहातून बाहेर कसे पडावे? हे सांगण्याकरिता आई-वडिलांच्या रूपाने साक्षात एक नव्हे तर दोन-दोन कृष्ण उपलब्ध आहेत. त्यांचा मुलांनी आदर केला, त्यांच्याशी संवाद साधला तर जीवन चक्रव्यूहात अडकलेला आजचा तरुण सहज बाहेर पडू शकतो. शेवटी 'मला वेळ नाही....' ही कविता सादर करून माणसाच्या अधोगतीचे कारण त्यांनी स्पष्ट केले.



प्रा.रायदास झोळ,प्रदीप गारटकर, राजेंद्र कोंढरे यांचेही यावेळी भाषणे झाली. छत्रपती शिवाजी महाराज, तसेच जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. बाबासाहेब शेळके, भरत मोरे, बबनराव कुटे, बिराजमामा माने, अनिल गलांडे, बाळासाहेब गायकवाड, लहूशेठ घोलप, राजेंद्र गायकवाड, नामदेव जगताप, सचिन जामले, तुकाराम काटकर, दिनेश मारणे, उमेश डिडवळ, किरण लंगोटे, दीपक सूर्यवंशी, धनाजी नलवडे, संतोष दाभाडे, यांनी महासंघाचे वतीने उपस्थित्यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन सुनील वाघ, परिचय वाचन भरत गायकवाड तर आभार प्रदर्शन पांडुरंग वाघ यांनी केले.

## एनएसएस सात दिवसीय विशेष शिबिराचा उत्साहात समारोप

राजगुरुनगर (दै. संध्या)




राजगुरुनगर (ता. खेड) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, राजगुरुनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत भांबुरवाडी (ता. खेड, जि. पुणे) येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ अंतर्गत दिनांक ६ ते १२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सात दिवसीय विशेष शिबिर यशस्वीपणे पार पडले. या शिबिराचे यावर्षीचे अधिकृत थीम – "शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व पडीक जमीन विकासावर विशेष भर" असे होते. शिबिराचे उद्‌घाटन माजी आमदार व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. यावेळी हू.रा.शी.प्र.म.चे उपाध्यक्ष सी.ए. बबनराव डांगले, सचिव डॉ. शिवाजीराव मोहिते, खजिनदार सुरेखाताई मोहिते उपस्थित होते. शिबिरादरम्यान विविध समाजोपयोगी व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. तुकाई मंदिर (ऐतिहासिक स्थळ) स्वच्छता, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायत परिसर स्वच्छता, तसेच वाघ धरण परिसरातील न वापरलेल्या जमिनीवर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. बौद्धिक सत्रांमध्ये डॉ. किशोर भागवत यांनी भारतीय संविधानाचा इतिहास, ॲड. संदीप दरेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, प्रा. राजाराम गरुड यांनी महिलांचे हक्क तर ॲड. संदीप घुले यांनी भारतीय संविधानातील मूलभूत हक्क या विषयांवर मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी ॲड. प्रा. संदीप तायडे, किरण काळे, प्रा. सलोनी वाडेकर, प्रा. अभिजीत वैद्य तसेच सर्व अध्यापक वर्गाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये अभिजीत शेवाळे, महेश सांडभोर, निलीमा राक्षे, उल्हास पानमंद, संगिता बोंबळे, संगिता राक्षे, पौर्णिमा भगत, पार्वती शिंदे व ज्ञानेश्वर हिंगे यांनी सक्रिय सहकार्य केले. विद्यार्थी स्वयंसेवकांमध्ये अशफाक पटेल, रेणुका खंडागळे, उपेन्द्र महतो, जुनेद शेख, अभिजीत राक्षे, गणेश काशीद, अवधूत सातकर, श्रावणी जाधव, श्रावणी देशमुख, दिव्या जाधव, रोहित जयभाये, चैतन्य आरूढे, साहिल खरात यांच्यासह इतर स्वयंसेवकाणी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. समारोपप्रसंगी सरपंच निता ढोरे, ग्रामसेविका रुपाली कोकरे, एनएसएस खेड तालुका समन्वय अधिकारी गणेश आहिरे तसेच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि संविधानिक मूल्यांची जाणीव अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## चाकणला भाविकांनी घेतले शिवलिंगाचे दर्शन

चाकण(दै. संध्या)



प्रति भीमाशंकर म्हणून प्रख्यात असलेल्या येथील श्री चक्रेश्वर मंदिर व मुटकेवाडी येथील महादेव मंदिरात हर हर महादेव, जय भोलेनाथाचा गजर करत हजारो भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. मुटकेवाडी येथे शिवकृपा मित्र मंडळाच्या वतीने उद्योजक अनिल गोसावी यांचे नेतृत्वाखाली विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे शिवकृपा मित्र मंडळाचे अध्यक्ष अनिल गोसावी व रागिनी गोसावी यांच्या हस्ते देवाचा अभिषेक व विविध महापूजा करण्यात आली. भाविकांनी सकाळपासूनच मंदिर परिसरात शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी तोबा गर्दी केली होती. दर्शनबारीतील भाविकांना फराळ व पाण्याचे वाटप करण्यात आल्याची माहिती खेड पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य महेंद्र मेदनकर व उद्योजक अनिल गोसावी यांनी दिली. खडगभवानी माता भजनी मंडळाच्या वतीने यावेळी भजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. भाविकांच्या भक्तीनामघोषाने अवघा चाकण परिसर भक्ती रसात चिंब झाला होता. यावेळी उद्योजक बप्पासाहेब जोगदंड, प्रवीण ढोले, नगरसेवक धीरज मुटके, नगरसेविका रेश्मा मुटके, अमोल गोसावी, विलास गोसावी, माधुरी गोसावी, प्रतिभाताई, रेश्मा गोसावी, अमित गोसावी, नवनाथ मुटके, अभिषेक मुटके, सचिन गोसावी, ऋषिकेश मुटके, निलेश गोसावी, मयूर मुटके, अमोल गोसावी आदी उपस्थित होते. रागिनी गोसावी, रेश्मा गोसावी व माधुरी गोसावी यांनी स्वागत केले.

## संगम येथील शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

खुटबाव (दै. संध्या)


संगम (ता. दौंड) येथे महाशिवरात्रीनिमित्त ५० हजार भाविकांनी पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेतले. देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पहाटे चार वाजता देवाचा अभिषेक झाला. त्यानंतर दुपारी १२ वाजता पिंपळगाव, न्हावरे, रांजणगाव सांडस, केडगाव देलवडी येथील शंभू महादेवाच्या कावडीनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. त्यानंतर भाविकांच्या वतीने फराळ वाटप करण्यात आले.

गर्दीचे नियमन होण्यासाठी यवत पोलिस व संतराज महाराज देवस्थानने नियोजन केले. यावेळी संस्थानचे अध्यक्ष नामदेव महाराज साठे, उपाध्यक्ष बाळासाहेब थोरात, सुदाम कोंडे, पोलिस पाटील निळकंठ थोरात, नारायण जगताप, शांताराम बोत्रे, मनोज थोरात, प्रमोद पठाण आदी उपस्थित होते. दिवसभरात आदित्य राहुल कुल, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सागर शेलार, संदीप कोहकडे, दौलत शितोळे यांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले.

## 'जगाच्या आकलेचे तारे' तोडणाऱ्या शिक्षकांवर कारवाई होणार का?

**शाळा प्रशासनाची भूमिका काय?**

लोणी काळभोर (दै. संध्या)



पुर्व हवेलीतील शाळेत शिक्षक की पत्रकार? असा प्रश्न सध्या ऐरणीवर आला असून, शिक्षक कम् पत्रकार म्हणून जोमात वावरणाऱ्या महाशयांवर शाळा प्रशासन कोणती कारवाई करणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. शाळेच्या वेळेतच पत्रकारिता जोमात सुरू असल्याची चर्चा असून, यासाठी संबंधित शिक्षकांना शाळा प्रशासनाची अधिकृत परवानगी आहे का, असा थेट सवाल नागरिकांकडून केला जात आहे. शिकवताना शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असून, पत्रकारिता मात्र वेगाने सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची चर्चा हवेली तालुक्यात रंगू लागली आहे. इतकेच नव्हे तर एखादा पालक तक्रार घेऊन शाळेत गेला असता, संबंधित महाशय पत्रकारितेचा धाक दाखवून पालकांना गप्प करत असल्याची माहिती समोर येत आहे. "पत्रकारिता जरूर करा, पण शाळेच्या वेळेत नको; शाळा सुटल्यावर करा," अशी स्पष्ट भूमिका अनेक पालकांनी मांडली आहे. मग हे महाशय गिरी पर्वतावर उभे राहून जगाच्या आकलेचे तारे का तोडत आहेत ? असा सवाल आता पूर्व हवेलीतील नागरिक विचारू लागले असून, शाळा प्रशासन यावर ठोस कारवाई करणार की मूकदर्शक राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# साहिल बिबवे, भाग्यश्री भंडारी शिवनेरी मॅरेथॉनमध्ये प्रथम

जुन्नर (दै. संध्या)



रविवार (दि.१५) रोजी शिवजयंती महोत्सवानिमित्त शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन,मोरडे फूड्स व पोल्ट्री ब्रिडर्स कोऑर्डिनेशन कमिटी यांच्यावतीने आयोजित चौथी शिवनेरी मॅरेथॉन स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत, थरार, रोमांच व प्रचंड जिद्द या सर्वांचा सुरेख संगम घडवत जुन्नरच्या निसर्गरम्य वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली.मॅरेथॉनमध्ये काही स्पर्धकांनी आपल्या अनोख्या वेशभूषेने लक्ष वेधून घेतलं. नऊवारी साडी, मावळा, वारकरी अशा वैविध्यपूर्ण वेशभूषांमध्ये स्पर्धकांनी सहभाग घेतला.

महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजीमहाराजांना मानवंदना देण्यासाठी आयोजित या स्पर्धेचं उद्‌घाटन शिवजन्मभूमीचे माजी आमदार अतुल बेनके, नागपूर परिमंडळचे माजी पोलीस महासंचालक डॉ.दिलीप पाटील भुजबळ,मोरडे फूड्सचे हर्षल मोरडे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांच्या हस्ते झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजयंतीच्या आदल्या रविवारी शिवनेरी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करुन मॅरेथॉनला प्रारंभ झाला. ५, १० व २१.१ किलोमीटर या तीन गटात ही स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेसाठी देश - विदेशातून आलेल्या हजारो धावपटूंनी शिवनेरी मॅरेथॉनचा थरार अनुभवला. या स्पर्धेत भारतीय स्पर्धकांत २१.१ किलोमीटर पुरुष गटात साहिल बिबवे तर महिला गटात भाग्यश्री भंडारी हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर केनियाचा चेरुय्योट टू हा ७३ मिनिट ३१ सेकंद वेळ नोंदवत सर्वाधिक वेगवान खेळाडू ठरला.

२१.१ किलोमिटर हाफ मॅरेथॉनमध्ये साहिल बिबवे याने ७८ मिनिट ८ सेकंद,तर भाग्यश्री भंडारी हेने ९३ मिनिट ७ सेकंद ही वेळ नोंदवली. दहा किलोमिटर अंतर गटात पुरुषांत स्वप्निल डोंगरे ३६ मिनिट ३१ सेकंद तर महिलांमध्ये साक्षी भंडारी ४१ मिनिट ५१ सेकंद वेळ नोंदवून पहिले आले. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देवून गौरविण्यात आले.

किल्ले शिवनेरी परिसरातील मॅरेथॉन मार्गावरील कुसुर, वडज, पारुंडे, काटेडे आणि येणेरे या गावांच्या दुतर्फा असलेली रंगीबेरंगी फुलांची, हिरवीगार भाजीपाल्याची शेती धावपटूंचा उत्साह द्विगुणित करत होती. यामध्ये जुन्नर व परिसरातील स्पर्धकही मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते. अबालवृद्ध धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेऊन शारीरिक क्षमता आणि जिद्दीचा आदर्श घालून दिला. संभळ, ढोलताशे, लेझीम या पारंपारिक वाद्यांनी वातावरणात आणखी रंग भरले.

मुख्य आयोजकांसह शिवाई देवी मंदिर ट्रस्ट, पोलिस प्रशासन, आरोग्य विभाग, जयहिंद शैक्षणिक संकुल आदी संस्थांच्या सहयोगाने ही स्पर्धा सुरक्षित व यशस्वीपणे पार पडली. ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी स्पर्धा मार्गावर दुतर्फा उभे राहून टाळ्यांचा कडकडाट, ढोल-ताशांचा गजर आणि 'हाऊ इज द जोश'च्या घोषणा देत धावपटूंचा उत्साह वाढवला.आकर्षक वेशभूषा आणि अनोखा पाहुणचार अनेक धावपटूंनीही वाद्यांवर ठेका धरत आनंद व्यक्त केला. तर ज्वारीपासून तयार केलेले नाश्त्याचे पदार्थ, थेट शेतातून धावपटूंना उपलब्ध केलेले ताजे द्राक्ष, स्ट्रॉबेरी, केळी, चिक्की इ खाद्यपदार्थ, फिजिओथेरपी डॉक्टरांचे पथक असो वा धावपटूंच्या मदतीसाठी तैनात असलेले ४०० हून अधिक स्वयंसेवक. जुन्नरकरांनी केलेल्या या पाहूणचाराने धावपटू भारावून गेले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्यात नॅशनल टी20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेचे उद्घाटन

■ द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन व ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन (बीसीए) यांच्या संयुक्त विद्यमाने व एचसीएल फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन (पीबीएमए) आणि ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन (बीसीए) तर्फे एचसीएल फाऊंडेशन च्या सहकार्याने पुण्यात नॅशनल टी20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेचे उद्‌घाटन डेक्कन जिमखाना मैदानात करण्यात आले. या प्रसंगी पुणे महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेते निलेश निकम, एचसीएल टेक चे उपाध्यक्ष अरुण अल्बर्ट, पीबीएमए चे अध्यक्ष राजेश शहा, कार्यकारी संचालक परवेज बिलीमोरिया, बीसीए चे अध्यक्ष रवी वाघ, एवलॉक इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक अनिर्भान मुखर्जी, सुहाना च्या आंतरराष्ट्रीय व्यवसायाचे संचालक विश्व चोरडिया, भारताच्या माजी महिला क्रिकेटपटू उज्वला पवार आणि शोभा पंडित, डेक्कन जिमखानाच्या क्रिकेट विभागाचे प्रमुख मृगांक राठी आदी मान्यवर उपस्थित होते. या टुर्नामेंट चे उद्‌घाटन कोथरूड गर्ल्स ब्लाइंड स्कूल आणि जागृती ब्लाइंड स्कूल आळंदी यांच्यात ५ ओव्हर्स या मैत्रीपूर्ण लढतीने झाली. या स्पर्धेतील सामन्यांचे आयोजन डेक्कन जिमखाना मैदान आणि पद्ममावती येथील टेंबेकर मैदान येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्र,राजस्थान,मध्य प्रदेश,गुजरात,कर्नाटक,उत्तर प्रदेश,पश्चिम बंगाल आणि चंदीगड या आठ संघांचा या स्पर्धेत सहभाग असून पाच दिवसात एकूण 13 सामने खेळवले जाणार आहेत. पहिला सामना सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी डेक्कन जिमखाना येथे अ गटातील महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश दरम्यान व कर्नाटक व उत्तरप्रदेश दरम्यान, तर टेंभेकर मैदानात ब गटातील पश्चिम बंगाल विरुद्ध राजस्थान आणि गुजरात विरुद्ध चंदीगड या संघात लढत होईल. अंतिम सामना आणि पारितोषिक वितरण समारंभ 19 फेब्रुवारी रोजी डेक्कन जिमखाना मैदानावर पार पडणार आहे.



### व्यवसाय विस्तार सुलभ करण्यासाठी फिक्कीने B2B आयोजित केल्या बैठका

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (मॅकसिया) आणि शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन सैफ झोन), शारजाह, युएई सरकार यांच्या सहकार्याने, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) ने युएई मार्फत जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासाठी भारतीय उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी पुण्यात बी२बी बैठकांची एक केंद्रित मालिका यशस्वीरित्या आयोजित केली. बैठकींमध्ये मध्य पूर्व, आफ्रिका, मध्य आशिया आणि रशियामधील व्यापार आणि गुंतवणूकीच्या संधींवर प्रकाश टाकण्यात आला. सहभागींना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विस्तार आणि निर्यात आणि सीमापार व्यवसाय ऑपरेशन्स वाढविण्यासाठी भारत-युएई व्यापक आर्थिक भागीदारी करार (सीईपीए) चा प्रभावीपणे वापर कसा करायचा याबद्दल अंतर्दृष्टी देखील मिळाली. या उपक्रमाने प्रादेशिक व्यवसायांना युएईमध्ये ऑपरेशन्स स्थापन करण्याचे फायदे समजून घेण्यासाठी एक धोरणात्मक व्यासपीठ प्रदान केले, विशेषतः सैफ झोनद्वारे, जो प्रदेशातील सर्वात कार्यक्षम आणि गुंतवणूकदार-अनुकूल फ्री झोनपैकी एक म्हणून ओळखला जातो. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणुकीतील भारताच्या वाढत्या सहभागाशी सुसंगत, भारतीय उद्योगांना जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी सक्षम करणारे प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी फिक्की वचनबद्ध आहे.

### आईडीबीआई बँकेने 'आरोग्य फिक्स्ड डिपॉझिट' योजना सुरू केली

पुणे (दैनिक संध्या) : आईडीबीआई बँकेने आज 'आरोग्य फिक्स्ड डिपॉझिट' योजना जाहीर केली. ही एक अनोखी फिक्स्ड डिपॉझिट योजना असून ती खात्रीशीर परतावा आणि अतिरिक्त आरोग्य विमा संरक्षण यांचा संगम घडवते. ग्राहकांच्या कल्याण आणि आर्थिक सुरक्षिततेबाबत बँकेची बांधिलकी यामुळे अधिक दृढ होते. या योजनेअंतर्गत ग्राहक 7.50 लाख रुपयांची निश्चित रक्कम 370 दिवसांच्या कालावधीसाठी गुंतवू शकतात आणि त्यांना 15 लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण तसेच फिक्स्ड डिपॉझिटवरील व्याज मिळेल. आरोग्य विमा संरक्षणाची सुविधा बँकेच्या निवडक विमा भागीदार केअर हेल्थ इन्शुरन्स मार्फत दिली जाईल. हा उत्पादन विशेषतः 18 वर्षे ते 58 वर्षे 11 महिने वयोगटातील निवासी वैयक्तिक ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. या योजनेच्या शुभारंभाबद्दल बोलताना आईडीबीआई बँकेचे उप-व्यवस्थापकीय संचालक श्री. सुमित फक्का म्हणाले, "आरोग्य फिक्स्ड डिपॉझिट योजना ही ग्राहक-केंद्रित नवकल्पनांवर आईडीबीआई बँकेचा सातत्यपूर्ण भर दर्शवते. खात्रीशीर परतावा आणि महत्त्वपूर्ण आरोग्य विमा संरक्षण यांचा संगम घडवून आम्ही आर्थिक स्थैर्य आणि आरोग्य सुरक्षा या दोन्हींचा समावेश असलेले सर्वसमावेशक समाधान देत आहोत."

### ' ...तर माझी जीभ नक्की कापा', हर्षवर्धन सपकाळ यांचं भाजपाला थेट आव्हान

पुणे (दैनिक संध्या) : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान हा छत्रपती शिवाजी महाराज यांना समकक्ष असल्याच्या केलेल्या विधानावरून सध्या मोठा वाद उफाळून आला आहे. तसेच सत्ताधारी भाजपाने सपकाळ यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सपकाळ यांच्या या विधानाविरोधात भाजपाकडून तीव्र आंदोलनं केली जात आहेत. यादरम्यान, सपकाळ यांची जीभ छाटण्याचंही आवाहन भाजपा नेत्यांनी केलं होतं, त्याला प्रत्युत्तर देताना सपकाळ यांनी थेट भाजपालाच आव्हान दिलं आहे. भाजपाचे अहिल्यानगरमधील शहराध्यक्ष अनिल मोहिते यांनी थेट हर्षवर्धन सपकाळ यांची जीभ छाटा, १० लाख रुपये देतो, असं विधान केलं होतं. त्याला प्रत्युत्तर देताना या संदर्भात केलेल्या ट्विटमध्ये हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, माझी जीभ कापल्यानंतर जर भारतीय शेतकऱ्यांचे अमेरिकेतून होणाऱ्या आयातीपासून संरक्षण होणार असेल, ही अन्यायकारक ट्रेड-डील रद्द होऊन शेतमालाला भाव मिळणार असतील, शेतकरी कर्जमुक्त होणार असेल, भाजप हिंदू-मुस्लिम द्वेषाला खतपाणी घालणार नसेल, चीनने बळकावलेला भूभाग परत मिळणार असेल तर माझी जीभ नक्की कापा.

# पुण्यात बॅगेलस्टाइनचे पाचवे स्टोअर सुरू; भारतातील विस्ताराचा पुढचा टप्पा

पुणे (दै. संध्या)




पुण्यात पाचवे स्टोअर उघडल्यानंतर, बॅगेलस्टाइन भारतातील वेगाने विकसित होणाऱ्या अन्न सेवा क्षेत्रात आपला ठसा वाढवत आहे. ब्रँडचा सतत विस्तार जागतिक कॅफे संकल्पनांसाठी वाढती ग्राहकांची मागणी प्रतिबिंबित करतो आणि आंतरराष्ट्रीय अन्न ब्रँडसाठी एक प्रमुख वाढीचे इंजिन म्हणून पुण्याचा उदय अधोरेखित करतो. बॅगेलस्टाइन मेट्रो बाजारपेठांमध्ये आपला प्रवास वेगवान करत असताना, ते भारतातील शहरी अन्नप्रेमींच्या वाढत्या समुदायाला विशिष्ट चव, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि एक दोलायमान जेवणाचा अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

२०११ मध्ये स्थापन झालेल्या फ्रान्सच्या बॅगेलस्टाइन या बॅगेलस्टाइनने फिनिक्स मार्केटसिटी, विमाननगर, पुणे येथे पाचव्या स्टोअरच्या उद्घाटनासह भारतात आपली उपस्थिती मजबूत केली आहे. ब्रँडच्या भारतातील प्रवासात आणखी एक मैलाचा दगड म्हणून, हे आउटलेट देशातील बॅगेलस्टाइनचे शुद्ध शाकाहारी रेस्टॉरंट स्वरूप म्हणून देखील वेगळे आहे, जे भारतीय ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या जीवनशैलीच्या पसंतींशी सुसंगत आहे. पुणे हे भारतातील सर्वात उत्साही जीवनशैली आणि अन्न गंतव्यस्थानांपैकी एक म्हणून उदयास येत असताना, हे शहर तरुण व्यावसायिक, विद्यार्थी, उद्योजक आणि जागतिक कामगारांना आकर्षित करत आहे जे सतत आंतरराष्ट्रीय पाककृती आणि सोयीस्कर गॉरमेट डायनिंग फॉरमॅटचा शोध घेत आहेत.

पुण्यातील सर्वात प्रीमियम रिटेल आणि मनोरंजन केंद्रांपैकी एक, फिनिक्स मार्केटसिटी उच्च गर्दी, आकांक्षा असलेले ग्राहक आणि अनुभवात्मक जेवणाचे आदर्श परिसंस्था देते - ते बॅगेलस्टाइनच्या विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी एक धोरणात्मक स्थान बनवते. भारतातील बॅगल्सची वाढती लोकप्रियता ग्राहकांच्या बदलत्या पसंती दर्शवते, जिथे जलद सेवा स्वरूप गुणवत्ता, ताजेपणा आणि आनंददायीपणाला पूर्ण करतात. बॅगल्सटाईनचा मेनू ओव्हन-फ्रेश हस्तनिर्मित शाकाहारी बॅगल्स, प्रीमियम फिलिंग्ज, स्टॅक केलेले सँडविच, चवदार स्प्रेड्स, कलात्मक कॉफी, ताजेतवाने पेये आणि आनंददायी मिष्टान्नांसह या बदलाची पूर्तता करतो. त्याच्या युरोपियन मुळांशी खरेखुरा, ब्रँड प्रामाणिकपणा आणि सर्जनशीलतेचे मिश्रण करतो आणि एक कॅज्युअल परंतु प्रीमियम कॅफे अनुभव देतो. विस्तारावर भाष्य करताना, फ्रँचायझी इंडियाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौरव मरिया म्हणाले, "जागतिक अन्न ब्रँड आज भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासाठी आणि विस्तार करण्यासाठी सर्वात कार्यक्षम आणि स्केलेबल मार्ग म्हणून फ्रेंचायझिंगकडे पाहत आहेत. देशाची मजबूत उपभोग कथा, तरुण लोकसंख्याशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय चवींची भूक हे जागतिक QSR आणि कॅफे ब्रँडसाठी एक आकर्षक गंतव्यस्थान बनवते. बॅगल्सटाईनचा सातत्यपूर्ण विस्तार ब्रँड सुसंगतता आणि ऑपरेशनल उत्कृष्टता राखताना संरचित फ्रेंचायझिंग जलद बाजारपेठेत प्रवेश कसा सक्षम करते हे प्रतिबिंबित करते." पुण्याच्या विकास कथेबद्दल आपला दृष्टिकोन मांडताना, ब्रँडच्या भारतातील नेतृत्वातील बॅगेलस्टाइन - (पुणे, महाराष्ट्र आणि गोवा) येथील क्षेत्रीय विकासक सपना पोद्दार आणि मोहित सिंघल म्हणाले, "पुणे हे प्रीमियम तरीही सुलभ जेवणासाठी उच्च-ऊर्जा बाजारपेठेत वेगाने विकसित झाले आहे.

येथील प्रेक्षक जागतिक चव, दर्जेदार घटक आणि भिन्न कॅफे स्वरूपांना पसंत करतात. शुद्ध शाकाहारी बॅगेलस्टाइन अनुभव सादर केल्याने आम्हाला ब्रँडचे आंतरराष्ट्रीय स्वरूप टिकवून ठेवताना सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित राहण्यास मदत होते. फिनिक्स मार्केटसिटी आम्हाला अन्नप्रेमींच्या विस्तृत समुदायाशी जोडण्यासाठी एक परिपूर्ण व्यासपीठ प्रदान करते."

## 'भाजपात राहून शिंदेंशी लढता येणार नाही, स्वगृही परत या'

मुंबई (दै. संध्या)

■ गणेश नाईकांना संजय राऊतांची खुली ऑफर

राज्यातील सत्ताधारी असलेल्या महायुतीमधील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री गणेश नाईक यांच्यामध्ये गेल्या काही काळापासून ठाणे, नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरावरील वर्चस्वावरून मोठ्या प्रमाणावर राजकीय संघर्ष सुरू आहे. दोन्ही नेते आणि त्यांच्या समर्थकांकडून सातत्यांने एकमेकांना आव्हान आणि प्रतिआव्हान दिले जात आहे. आरोप प्रत्यारोप होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आता उद्धवसेनेचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांनी गणेश नाईक यांना खुली ऑफर दिली आहे. भाजपामध्ये राहून शिंदेंविरोधात लढता येणार नाही, त्यामुळे गणेश नाईक यांनी स्वगृही परत आलं पाहिजे, अशी ऑफर संजय राऊत यांनी दिली आहे. महानगरपालिका निवडणुकीदरम्यान नवी मुंबईत पेटलेला नाईक आणि शिंदेंमधील संघर्ष गेल्या काही दिवसांत पुन्हा उफाळून आला आहे. यादरम्यान, माझ्या नादाला लागलात तर माजी खासदार करून टाकेन, असा इशारा गणेश नाईक यांनी श्रीकांत शिंदे यांना दिला होता. त्यानंतर एवढीच खुमखुमी असेल तर लोकसभा निवडणुकीत आमच्याविरोधात लढा, असं आव्हान श्रीकांत शिंदे यांनी गणेश नाईक यांना दिलं होतं.

## 'लेन्सकेप केरळ' छायाचित्र प्रदर्शन आणि 'मास्टरक्लास' चे पुण्यात आयोजन

पुणे (दै. संध्या)



'केरळ टुरिझम' तर्फे 'लेन्सकेप केरळ' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात दहा नामवंत छायाचित्रकारांनी संपूर्ण केरळमध्ये टिपलेल्या १०० निवडक छायाचित्रांचा संग्रह सादर केला जाणार आहे.

केरळमधील लोकांचे वैविध्यपूर्ण जीवन, संस्कृती, निसर्गसौंदर्य, वन्यजीव आणि दैनंदिन जीवनातील क्षण अशा विविध विषयांना या प्रदर्शनात स्थान देण्यात आले आहे. दहा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून साकारलेले हे प्रदर्शन 'गॉड्स ओन कंट्री' म्हणजेच केरळचे एक चैतन्यमय आणि आधुनिक रूप प्रेक्षकांसमोर उभे करते.

हे प्रदर्शन १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान सकाळी ११:०० ते रात्री ८:०० वाजेपर्यंत राजा रवि वर्मा गॅलरी, आर्ट टुडे स्टुडिओ, घोले रोड, शिवाजीनगर येथे असणार आहे या प्रदर्शनात प्रवेश विनामूल्य आहे. प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी (१९ फेब्रुवारी) प्रसिद्ध छायाचित्रकार सौरभ आनंद चॅटर्जी आणि बालन माधवन यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष 'फोटोग्राफी मास्टरक्लास' आयोजित केला जाईल.

प्रसिद्ध कला समीक्षक उमा नायर यांनी या प्रदर्शनाचे क्युरेशन (नियोजन) केले असून, पुरस्कार विजेते छायाचित्रकार बालन माधवन यांनी याचे दिग्दर्शन केले आहे. या प्रदर्शनात एच. सतीश, शिवांग मेहता, अमित पसरिचा, सौरभ आनंद चॅटर्जी, सैबल दास, उमेश गोगना, मनोज अरोरा, ऐश्वर्या श्रीधर, नताशा कर्तार हेमराजानी आणि कौनतेय सिन्हा या दिग्गज छायाचित्रकारांच्या कलाकृती पाहायला मिळतील.

**कार्यक्रमाचा तपशील**

प्रदर्शन
१८ ते २० फेब्रुवारी २०२६
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८पर्यंत
प्रवेश : विनामूल्य (मोफत)
मास्टरक्लास
१९ फेब्रुवारी २०२६
वेळ : दुपारी २ ते ४
मार्गदर्शक : प्रसिद्ध छायाचित्रकार सौरभ आनंद चॅटर्जी आणि बालन माधवन
प्रवेश : विनामूल्य (मोफत)
स्थळ : राजा रवि वर्मा गॅलरी, आर्ट टूडे स्टुडिओ, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे.

## डॉ. अनुराग कश्यप यांना 'आयआयए'चा जीवनगौरव पुरस्कार

पुणे (दै. संध्या)




द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सच्या (आयआयए) पुणे विभागातर्फे तर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा आर्किटेक्चर शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दलचा 'एस. जे. कॉन्ट्रॅक्ट्स् प्रायव्हेट लिमिटेड जीवनगौरव पुरस्कार' महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनचे (बीएनसीए) संस्थापक प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांना पुणे शहराचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आयआयएचे अध्यक्ष आर्किटेक्ट विकास आचलकर, उपाध्यक्ष सीतेश अग्रवाल आणि एस. के. बेलवलकर हाऊसिंगचे समीर बेलवलकर आणि एस. जे. कॉन्ट्रॅक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे सौरभ जंगले उपस्थित होते. आयआयएचे पदाधिकारी आर्किटेक्ट महेश बांगड, आर्किटेक्ट शैलेश दनदने, आर्किटेक्ट संदीप महाजन आणि अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुष्पगुच्छ, शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुणेरी पगडी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 1994 पासून गेली 31 वर्षे बीएनसीएचे प्राचार्यपद भूषवलेले डॉ. कश्यप यांचे आर्किटेक्चर शैक्षणिक क्षेत्रातील स्थान मोठे आहे. ते डिझाईन इन्स्टिट्यूटचे प्राचार्य असून ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अकादमिक समितीमध्ये आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या आर्किटेक्चर आणि अन्य क्षेत्रांसाठी स्थापन केलेल्या पीएचडी संशोधन केंद्राचे अध्यक्ष असून आतापर्यंत केवळ आर्किटेक्चर क्षेत्रात या संशोधन केंद्रात 50 स्नातकांना मार्गदर्शनाचे काम त्यांनी केले आहे. डॉ. कश्यप यांच्या नेतृत्त्वाखाली 'आयएसडीएस'तर्फे (शाश्वतता अध्यायन विकास संस्था) आणि विद्यार्थिनींसाठी पहिले ड्रोन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केला आहे. ऑक्सफर्डच्या ॲकेडमिक युनियनचे सदस्य असणाऱ्या डॉ. कश्यप यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत 68 आंतरराष्ट्रीय अकादमिक सहयोग व सामंजस्य करार करण्यात आले आहेत. देशातील पहिला पदव्युत्तर पर्यावरणीय आर्किटेक्चर विभागात तर आशिया खंडातील पहिला डिजिटल आर्किटेक्चर पदव्युत्तर विभाग सुरू करण्याचा मानही डॉ. कश्यप यांचेकडे जातो.

'आयआयए'च्या 'आर्किटेक्चर व्यवसायातील उत्तुंग कामगिरी केलेल्या एस. के. बेलवलकर पुरस्कारां'मध्ये ज्येष्ठ आर्किटेक्ट विष्णूकुमार विश्वास उर्फ व्ही. व्ही. बडवे, ज्येष्ठ आर्किटेक्ट नरेंद्र डेंगळे आणि ज्येष्ठ शहर नियोजनकार रामचंद्र गोहाड यांनाही शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पुणेरी पगडी प्रदान करून गौरवण्यात आले. याशिवाय शैक्षणिक क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या बीएनसीएमधील प्रा. डॉ. अस्मिता जोशी, एमआयटी कॉलेज ऑफ अर्किटेक्चरच्या प्राचार्य डॉ. अश्विनी पेठे आणि आर्किटेक्ट विनिश देसाई यांनाही पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन 'एस. जे. कॉन्ट्रॅक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड एक्सलन्स इन टिचिंग' या पुरस्काराने गौरवण्यात आले.

'आयआयए'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धामधील विजेत्यांनाही यावेळी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तसेच बॉक्स क्रीकेट ट्रॉफीचे अनावरणही अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.


## टिपू सुलतान नावाच्या विरोधावरून भाजपाचा दुटप्पीपणा उघड

मुंबई (दै. संध्या)

टिपू सुलतान यांच्या नावाला विरोध करणाऱ्या भाजपाचा दुटप्पीपणा आणि ध्रुवीकरणाच्या अजेंड्यासाठी सुरू असलेले विकृत धर्मांधतेचे राजकारण अनेक ठोस उदाहरणांवरून स्पष्ट होत असल्याचा आरोप काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी केला आहे. त्यांनी यासंदर्भात एक ट्विट करत भाजपाच्या भूमिकेवर जोरदार टीका केली आहे. सचिन सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१२ साली अकोला महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहाला "शहीदे वतन शेरे म्हैसूर टिपू सुलतान" असे नाव देण्याचा ठराव भाजपानेच मांडला होता. या ठरावाचे सूचक तत्कालीन महापौर आणि सध्याचे भाजप अकोला महानगर निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल होते. त्याचप्रमाणे २०१३ मध्ये मुंबईच्या एम/पूर्व वॉर्डमधील एका रस्त्याला "शहीद टिपू सुलतान मार्ग" असे नाव देण्याचा प्रस्ताव भाजप नगरसेवकाने मांडला होता. या प्रस्तावाला भाजपाचे नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ठरावामध्ये सध्याच्या महापौर रितू तावडे यांचेही नाव असल्याचा दावा करण्यात आला आहे. याआधी २००१ साली अंधेरी (पश्चिम) येथे "शेरे म्हैसूर टिपू सुलतान मार्ग" असे नामकरण करण्यात आले होते. भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्या उपस्थितीत आणि भाजप नगरसेवकांच्या संमतीने हा ठराव एकमताने मंजूर झाला होता. याशिवाय, भाजप नेते व कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडीयुरप्पा यांनी टिपू सुलतान यांच्या कबरीला भेट देऊन अभ्यागत वहीत गौरवोद्गार नोंदवले होते. तसेच २०१७ मध्ये कर्नाटक विधानसभेत तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनीही टिपू सुलतान यांच्याविषयी गौरवोद्गार काढले होते, असेही सचिन सावंत यांनी नमूद केले आहे. या सर्व उदाहरणांचा दाखला देत सचिन सावंत यांनी सवाल केला आहे की, "भाजपाला आधी टिपू सुलतान प्रिय होते, मग आज अचानक ते वाईट कसे झाले? हा बदल केवळ ध्रुवीकरणाच्या राजकारणासाठी आहे काय?"

# ७५ फाईलींना मंजुरी; दादांच्या निधनानंतर काही तासांत घडला खळबळजनक प्रकार

मुंबई (दै. संध्या)



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांत मंत्रालयात प्रचंड वेगाने फाईल्स फिरल्या. त्यात जवळपास २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अल्पसंख्याक विकास विभागाकडून शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्याचे काम होते. तिथे अजित पवारांच्या निधनाच्या दिवशी आणि त्यानंतर काही तासांमध्ये मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी हा कारनामा केला आहे. विशेष म्हणजे १२ ऑक्टोबर २०२५ रोजी माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रमाणपत्र वाटपाला स्थगिती दिली होती. त्यानंतर कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर हा विभाग अजितदादांकडे होता. याबाबत प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी म्हटलं की, २८ डिसेंबरला ज्यादिवशी अजित पवारांचे निधन झाले. त्यानंतर अचानक राज्यातील २० संस्थांच्या ७५ शाळांना २८ ते ३० डिसेंबर या कालावधीत संध्याकाळी ६.३० वाजता, ७ वाजता, ८ वाजता अधिकाऱ्यांनी तातडीने प्रमाणपत्र वाटपाचा निर्णय घेण्यात आला. ३ महिन्यापूर्वी या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. त्यानंतर या खात्याच्या मंत्र्यांचे निधन झालेले असताना अधिकाऱ्यांनी ही घाई का केली, हा संवेदनशील विषय असता अधिकाऱ्यांनी निर्लज्जपणा केला असा आरोप त्यांनी केला.

एखाद्या शाळेला अल्पसंख्याक दर्जा मिळाल्यानंतर त्यांना शिक्षक भरतीत TET लागू होत नाही. या शाळांवर RTE कायदा लागू होत नाही. माणिकराव कोकाटे यांनी १२ ऑक्टोबरला आदेश दिले होते. या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. मात्र असंवेदनशील अधिकाऱ्यांनी अजितदादांच्या निधनानंतर लगेच ही प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आम्ही हा प्रकार उघडकीस आणला आहे. या निर्णयामागे आर्थिक हितसंबंध आहेत. एकटा अधिकारी हे करू शकत नाही. यामागे संपूर्ण नेटवर्क असेल. या अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे अशी मागणी अक्षय जैन यांनी मुख्यमंत्री फडणवीसांकडे केली. अजित पवारांचं विमान अपघाती निधन झाल्यानंतर त्याचदिवशी मंत्रालयात ३ वाजून ९ मिनिटांनी पहिले प्रमाणपत्र जारी करण्यात आले. ज्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा दिला त्यात २५ पोदार इंटरनॅशनलच्या शाळांचा समावेश आहे. अजित पवारांच्या निधनादिवशीच ६ शाळांना प्रमाणपत्र जारी करण्यात आले. राज्यात दुखवटा असताना आणि विशेष म्हणजे या खात्याच्या मंत्र्यांचे निधन झाले असतानाही अधिकाऱ्यांनी या शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा दिला.

घाईघाईने शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याची ही घटना चुकीची आहे. या प्रकरणाचा तपास व्हायला हवा. अल्पसंख्याक शाळांमध्ये आपल्याच कुटुंबातील लोकांना नोकरी देऊन सरकारचा पैसा खाल्ला जातो.

याबाबत मागे आम्ही तक्रार केली होती. जेवढ्या अल्पसंख्याक दर्जाच्या शाळा आहेत तिथे फक्त व्यापार चालतो, विद्यार्थ्यांना शिकवले जात नाही. त्यामुळे मंत्रालयातील या प्रकाराचा तपास करून जो कुणी यात दोषी आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील असा इशारा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी दिला आहे. त्याशिवाय या प्रकाराची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी तातडीने पाऊले उचलावीत अशी मागणीही त्यांनी केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त औंध रोड परिसरात महापालिकेची संयुक्त मोहीम

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेच्या औंध रोड कार्यालयाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परिसर स्वच्छता व पाहणीसाठी विशेष संयुक्त मोहीम (ड्राईव्ह) राबविण्यात आली. या मोहिमेत सर्व विभागांचे प्रमुख, वार्ड अधिकारी नायकर यांच्यासह आरोग्य, अतिक्रमण, विद्युत, उद्यान तसेच ड्रेनेज विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. ही पाहणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते राजर्षी शाहू महाराज चौक या मार्गावर घेण्यात आली. पाहणीदरम्यान परिसरातील स्वच्छता, अतिक्रमण, विद्युत व्यवस्था, हिरवळ तसेच ड्रेनेज व्यवस्थेचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्यासह नगरसेवक सनी निम्हन, नगरसेविका सपना छाजेड, भक्ती गायकवाड तसेच आनंद छाजेड, अमित मुरकुटे, अविनाश कदम व अन्य स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी परशुराम वाडेकर, उपमहापौर, पुणे यांनी अशाच स्वरूपाची मोहीम दोन महिन्यांतून एकदा संपूर्ण शहरातील सर्व प्रभागांतील झोपडपट्ट्या व प्रमुख रस्त्यांवर राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या सातत्यपूर्ण मोहिमेमुळे नागरिकांच्या दैनंदिन समस्या तातडीने सोडविण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### दीड तासात खून प्रकरणाचा उलगडा; आरोपीला अटक

पुणे (दैनिक संध्या) : येरवडा येथील लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या खून प्रकरणात पोलिसांनी अवघ्या दीड तासात आरोपीला जेरबंद करत तत्पर कारवाईचे उदाहरण घालून दिले आहे. या प्रकरणात आरोपी गणेश वसंत शिंदे (वय ३४) याला अटक करण्यात आली आहे. या घटनेत माशक गजीबक्श विजपुरे (वय ४०) यांचा मृत्यू झाला असून, मयताची बहीण मालन बी. मेहबूब उत्साद (वय ४७) यांनी याबाबत तक्रार दाखल केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, आरोपी गणेश शिंदे व मयत माशक विजपुरे हे एकाच ठिकाणी बसलेले असताना त्यांच्यात किरकोळ वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. मयताने आई-बहिणीवरून शिवी दिल्याच्या रागातून आरोपीने बांबूने मयताच्या डोक्यावर प्रहार केला. गंभीर जखमी झालेल्या विजपुरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मयत कॅन्टीनमध्ये काम करत होता, तर आरोपी पेंटर म्हणून काम करतो. दोघेही परस्पर मित्र असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी जलद तपास करत आरोपीला अल्पावधीत अटक केली. त्यांच्या नेतृत्वाखालील तत्पर कारवाईमुळे पोलिसांची कार्यक्षमता पुन्हा अधोरेखित झाली आहे. या घटनेचा पुढील तपास लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.



### भवरापूर विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी रविंद्र साठे

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : भवरापूर विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी रविंद्र साठे तर व्हाईस चेअरमनपदी संभाजी कान्हाळे यांची निवड झाली. निवडणूक अधिकारी संतोष तळपे यांनी काम पाहिले तर संस्थेचे सचिव दौलत भालेराव यांनी मदत केली. मावळते चेअरमन संदिप साठे व व्हाईस चेअरमन संतोष सातव यांनी राजीनामा दिल्याने सदर जागेवर निवडणूक घेण्यात आली. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य धनंजय साठे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजाराम कांचन, रा.कॉ.जेष्ठ नागरिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सोनबा चौधरी, तंटामुक्तीचे अध्यक्ष महादेव कांचन, सरपंच योगेश साठे, प्रकाश हरपळे, माजी सरपंच सुभाष साठे, माजी सरपंच आदर्श सचिन सातव, तंटामुक्ती अध्यक्ष अनिल साठे, उद्योजक संजय साठे, माजी उपसरपंच किरण साठे, सुरेश टिळेकर, विलास साठे, विनोद साठे, प्रकाश लोंढे, शरद चौधरी, नंदकुमार मुरकुटे, विठ्ठल कांचन आदी सर्व संचालक मंडळ, सभासद, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्क्रू ड्रायव्हरने तरुणाचा खून करणारे चार हल्लेखोर ताब्यात

चाकण (दैनिक संध्या) : स्क्रू ड्रायव्हरने वार करून सोलापूरच्या एका वीस वर्षे तरुणाचा अत्यंत निर्दयीपणे फरशी डोक्यात घालून खून केल्याप्रकरणी ताब्यात घेतलेल्या चौघांपैकी दोघांना अटक करण्यात आली. प्रथमेश शशिकांत माने (वय - २०, सध्या रा. शिरोली, ता. खेड, मूळ रा. मंगळवेढा, जि. सोलापूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. शशिकांत दाजी माने (वय - ४८, रा. कमल पार्क सोसायटी, निघोजे, ता. खेड) यांनी याप्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. शशिकांत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैभव संजय शिंदे (वय - २०, रा. श्रीराम सोसायटी, चाकण) व अनुज संदीप परदेशी (वय - १९, रा. माळआळी, चाकण.) यांना अटक करण्यात आली आहे. दोन अल्पवयीन विधी संघर्षित मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाकण येथील नेहरू चौकामधील मच्छी मार्केटमध्ये अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या गल्लीत भरदिवसा प्रथमेश माने व चार हल्लोखोरांमध्ये जुन्या वादातून तुंबळ हाणामारी झाली. या हाणामारीत हल्लेखोरांनी माने याच्या डोक्यात फरशी घालून व बर्फ फोडण्याचा टोचा मारून गंभीर जखमी करून त्याचा खून केला. प्रथमेश माने याच्यासमवेत त्याचे आई वडील राहत होते. चाकण उत्तर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

### बारामतीत अजित पवारांच्या स्मृतींना अर्पण

बारामती (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीचा चेहरामोहरा बदलला, विकासाची गंगा बारामतीत आणली, त्यांच्या स्मृती कायमस्वरुपी जतन व्हाव्यात या उद्देशाने बारामतीतील नटराज नाटय कला दालनामध्ये अजित पवार यांच्या छायाचित्रांचे कायमस्वरुपी दालन उभारणार असल्याची घोषणा नटराजचे अध्यक्ष किरण गुजर यांनी केली. बारामतीत सोमवारी (ता. 16) माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. किरण गुजर म्हणाले, अजित पवार यांच्या छायाचित्रांचे कायमस्वरुपी दालन तयार करण्याची जबाबदारी श्रीकांत अनपट यांच्याकडे दिली असून दर सहा महिन्यांनी छायाचित्रे बदलली जातील.

# पुरंदर भाजपकडून हर्षवर्धन सपकाळ यांचा तीव्र निषेध

**सासवड (दै. संध्या)**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अठराव्या शतकातील क्रूरकर्मा शासक टिपू सुलतानची तुलना थेट युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या 'घाणेरड्या' वक्तव्यामुळे तमाम शिवप्रेमींच्या आणि महाराष्ट्रवासीयांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, याचा निषेध करण्यासाठी पुरंदर-हवेली भारतीय जनता पार्टीच्या वतीने सोमवारी (ता. १६) सासवड येथील शिवतीर्थावर आक्रमक निदर्शने करण्यात आली. सोमवारी सकाळी भाजपच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी शिवतीर्थावर एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला




पुष्पहार अर्पण करून वंदन केले. त्यानंतर सपकाळ यांच्या विधानाचा निषेध करण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. "स्वराज्य संस्थापक शिवरायांची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही, असे वक्तव्य करणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि इतिहासाचा घोर अपमान आहे," असा आक्रमक पवित्रा कार्यकर्त्यांनी यावेळी घेतला. या निषेध आंदोलनाप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, निरा मार्केट कमिटीचे सभापती संदीप फडतरे, शैलेश तांदळे, शहराध्यक्ष आनंद जगताप, संभाजी काळाणे, मंडल अध्यक्ष संजय निगडे, संदीप कटके आणि साकेत जगताप उपस्थित होते. तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, शैलेंद्र ठकार, विठ्ठल मोकाशी, चंद्रकांत बोरकर, तुषार ढुमे, सागर जगताप, तुषार जगताप, संपत जाधव, हर्षवर्धन पायगुडे यांसह भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व शिवप्रेमी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुरंदरच्या राजकीय वर्तुळात या आंदोलनाचे तीव्र पडसाद उमटले आहेत. "ऐतिहासिक तथ्यांची मोडतोड करून एका क्रूर शासकाचे उदात्तीकरण करणे आणि त्याची तुलना महाराजांशी करणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. सपकाळ यांनी तात्काळ माफी मागावी," अशी मागणी यावेळी भाजपाच्या पदाधिका-यांनी केली.

## इला फौंडेशनच्यावतीने पक्षी शास्त्र अभ्यासक्रम अंतर्गत निसर्ग सहल



**जेजुरी (दै. संध्या)**

इला फाउंडेशन संस्थेच्या वतीने पुणे येथे आयोजित केलेल्या सलग 22 व्या पक्षीशास्त्र अभ्यासक्रम कोर्स मधील सहभागी झालेले अभ्यासकांची इला हॅबिटॅट, पिंगोरी येथे निसर्ग सहल आयोजित करण्यात आली होती.या अभ्यासक्रमात सहभागी झालेल्या अभ्यासकांना या वेळी चिंतामणी हॉस्पिटल चे संचालक निसर्गप्रेमी ,व निसर्ग छायाचित्रकार डॉ. संजय रावळ आणि डॉ.दिलीप वाघोलीकर यांच्या हस्ते प्रमाणात वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी इला फाउंडेशन संस्थेचे डॉ.सतीश पांडे सर, पक्षीशास्त्र अभ्यासक्रमाचे संपर्क आणि नियोजन प्रमुख प्रमोद देशपांडे, संस्थेच्या उपाध्यक्षा सुरुची पांडे, डॉ. सतीश करमळकर इला हॅबिटॅट चे प्रमुख राहुल लोणकर, श्रीकांत कुलकर्णी, सचिन शिंदे, काका गायकवाड, माऊली खोमणे, वैभव गंधे, अभिराम राजंदेकर , संतोष जगताप उपस्थित होते.

## ब्लॅकमेल व मानसिक छळातून तरुणाची आत्महत्या

**बारामती (दै. संध्या)**

- खडकवासला येथील तिघांविरुद्ध गुन्हा
- आरोपी तरुणीचे वडील API – अटकेबाबत चर्चेला उधाण



बारामती तालुक्यातील मौजे रुई बयाजीनगर येथे घडलेल्या धक्कादायक घटनेत 23 वर्षीय तरुणाने मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.या प्रकरणी बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात खडकवासला (पुणे) येथील तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, 2023 अंतर्गत गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून,आरोपींपैकी एक आरोपी तरुणीचे वडील हे पुणे शहरात सहायक पोलीस निरीक्षक (API) पदावर कार्यरत असल्याने या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मयत विक्रम उर्फ बबलु नवनाथ कोळपे (वय 23, रा. बयाजीनगर, रुई, ता. बारामती, जि. पुणे) याने दिनांक 15 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 7 ते 7.45 या वेळेत आपल्या राहत्या घरातील किचनरूममध्ये स्लॅबला असलेल्या लोखंडी हुकाला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेनंतर त्यास तातडीने रुई ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यास मृत घोषित केले.घटनास्थळी मिळालेल्या सुसाईड नोटमध्ये विक्रमने एका तरुणीमुळे गेल्या पाच वर्षांपासून मानसिक छळ, धमक्या व ब्लॅकमेलिंगला सामोरे जावे लागत असल्याचा उल्लेख केला आहे. संबंधित तरुणीने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन आपला भावनिक व आर्थिक वापर केल्याचा तसेच फोटो व चॅटिंगच्या आधारे धमकावल्याचा आरोपही या नोटमध्ये नमूद करण्यात आला आहे.

मयताच्या नातेवाईकांनी पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार,संबंधित तरुणी,तिची बहीण व वडील यांनी विक्रमला पुण्यात बोलावून त्याच्या मोबाईलमधील फोटो व चॅट्स जबरदस्तीने डिलीट केले तसेच त्याला गंभीर परिणामांची धमकी दिली होती. विशेष बाब म्हणजे, आरोपी तरुणीचे वडील हे पुणे येथे API म्हणून कार्यरत असून,त्यांनीही फोनवरून दमदाटी व धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या बाबींची प्रथमदर्शनी माहिती तपासात समोर येत आहे.

या संपूर्ण प्रकरणात बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात सृष्टी विकास मते, श्रुती विकास मते व विकास मते (सर्व रा. खडकवासला, पुणे) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत कलम 108, 351(2), 351(3), 352 व 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी एक पोलीस अधिकारी असल्याने अटकेबाबत कायदेशीर प्रक्रिया काय असणार, तसेच वरिष्ठ स्तरावरून काय निर्णय घेतला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.सदर प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून,सुसाईड नोट, मोबाईल डेटा,कॉल रेकॉर्ड्स व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

## संभाजी कदम बास्केटबॉल अकादमीचे ऐतिहासिक यश

**१३ वर्षांखालील गटात पहिले विजेतेपद**

**पुणे (दै. संध्या)**

संभाजी कदम बास्केटबॉल अकादमीने (एसकेबीए) पुणे जिल्हा बास्केटबॉल अकादमीच्या १३ वर्षांखालील गटात पहिले विजेतेपद पटकावत इतिहास रचला आहे. अकादमीच्या स्थापनेपासून अवघ्या अडीच वर्षांच्या अल्प कालावधीत मिळवलेले हे यश विशेष ठरले असून, जिल्हा स्तरावर त्यांच्या वर्चस्वाची नोंद झाली आहे.

एसकेबीएच्या मुलांच्या संघाने स्पर्धेत एलिट-लेव्हल बास्केटबॉलचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर १५ ते २० गुणांच्या फरकाने विजय मिळवला. कोर्टवरील खेळाडूंची धडपड, शिस्तबद्ध खेळ आणि रणनीतीची अचूक अंमलबजावणी यामुळे संघाने स्पर्धेत ठसा उमटवला. विजयी संघात आदित्य गुघारकर, राजवर्धन भंडारे, अमर राजपाल, तनुष माने, तनुज महाजन, मयंक शर्मा, अरहंत शिंदे, आरव झिरवाल, विहान साळुंखे, जसवंत सिंग, परम नायक आणि आरुष तोमर यांचा समावेश होता.

या अकादमीचे नेतृत्व संचालक व संस्थापक शरद नागणे यांच्याकडे असून त्यांच्या दूरदृष्टीमुळे अल्पावधीतच हे यश शक्य झाले. भारतीय बास्केटबॉलचे प्रणेते आणि भारतीय राष्ट्रीय संघाचे सध्याचे प्रशिक्षक संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाचाही संघाला मोठा लाभ झाला.

अकादमीच्या वाढीसाठी आणि परिसरातील तरुण खेळाडूंच्या विकासासाठी राहुल (आप्पा) भंडारे व अश्विनी



भंडारे (नगरसेवक, पीएमसी) यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल अकादमीने आभार व्यक्त केले.

प्रशिक्षकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे पहिले विजेतेपद मिळाल्याचे संस्थापक शरद नागणे यांनी सांगितले. या यशामागे संजय सावंत, धोंडिराम उत्तेकर, नीलेश कदम, राहुल भंडारे, सतीश, ओमप्रकाश जाखर, धनंजय नाखले, प्रणव जगताप आणि अथर्व जगताप या प्रशिक्षकांचे योगदान महत्त्वाचे ठरले.

तसेच, स्पर्धेदरम्यान पालकांनी दिलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे संघाचा आत्मविश्वास वाढल्याचे नमूद करत शरद नागणे यांनी सर्व पालकांचे मनापासून आभार मानले.

## वाल्हे येथील शिवमंदिराचे भाविकांना आकर्षण

**वाल्हे (दै. संध्या)**

वाल्हे ( ता.पुरंदर ) येथील शिवमंदिरात महाशिवरात्री निमित्त शेकडो भाविकांनी हर हर महादेवच्या जयघोषात स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेतले. यावेळी मंदिरात शंभू महादेवाची रेखाटलेली आकर्षक रांगोळी तसेच रंगबेरंगी पाना फुलांनी शिवलिंगाची केलेली सजावटच भाविकांसाठी आकर्षणाचा विषय ठरली. परंपरेनुसार महाशिवरात्रीनिमित्त येथील शिवमंदिरात पहाटे पासूनच भाविकांनी देवदर्शनासह अभिषेक तसेच पूजा अर्चा करण्यासाठी अलोट गर्दी केली होती.या दरम्यान भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांच्या वतीने महादेवाच्या पिंडीस मंगलस्नान घालून दुग्धाभिषेक घालण्यात



आला. त्यानंतर बेलफुलांची मुक्त उधळण करून भक्तिमय वातावरणात भाविकांनी स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिराचे पुजारी सचिन आगलावे यांच्या हस्ते विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरवात करण्यात आली.त्यानंतर एकता प्रतिष्ठानच्या वतीने भाविकांना उपवासाच्या खिचडीसह चिक्की व केळीचे वाटप करण्यात आले.

# राज्यातील ५२ शेतकऱ्यांचा युरोप अभ्यास दौरा प्रारंभ

**पुणे (दै. संध्या)**

राज्यातील शेती अधिक आधुनिक, स्पर्धात्मक व शाश्वत करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने सन २०२५-२६ अंतर्गत “राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे” ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत युरोप देशांचा अभ्यास दौरा दि 15 फेब्रुवारी 2026 पासून प्रारंभ झाला असून राज्यातील विविध जिल्ह्यांतील एकूण ५२ प्रगतिशील शेतकरी व दोन कृषी अधिकारी या अभ्यास दौऱ्यात सहभागी झाले आहेत.

अभ्यास दौऱ्यासाठी प्रस्थान करण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या गटाशी माननीय कृषिमंत्री दत्तात्रय भरणे




यांनी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. त्यांनी शेतकऱ्यांना शुभेच्छा देत या दौऱ्यातून मिळणारे ज्ञान, तंत्रज्ञान व अनुभव राज्यातील इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून आधुनिक व जागतिक दर्जाची शेती उभारण्यासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी यावेळी नमूद केले. या प्रसंगी कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) श्री रफिक नाईकवाडी यांनी देखील सहभागी शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

हा अभ्यास दौरा फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी आणि नेदरलँड्स या प्रगत कृषी देशांमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यादरम्यान शेतकरी आधुनिक पीक पद्धती, यांत्रिकीकरण, सेंद्रिय शेती, दुग्धव्यवसाय, सहकारी प्रक्रिया उद्योग, हरितगृह तंत्रज्ञान, जलसंधारण व हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धतींचा प्रत्यक्ष अभ्यास करणार आहेत.

फ्रान्समध्ये व्यावसायिक धान्यशेती (गहू, बार्ली, मका इ.) व दुग्धशेती प्रकल्पांना भेट देऊन पीक फेरपालट, मृदा व्यवस्थापन व अत्याधुनिक कृषी यंत्रसामग्री यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. स्वित्झर्लंडमध्ये सेंद्रिय शेतीसाठी जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या Research Institute of Organic Agriculture (FiBL) या संस्थेला भेट देऊन सेंद्रिय उत्पादन प्रणाली, संशोधन पद्धती व शाश्वत शेती मॉडेल्सची माहिती घेण्यात येईल. तसेच पर्वतीय दुग्धव्यवसाय व सहकारी चीज उत्पादन प्रणालीचा अभ्यास केला जाणार आहे. नेदरलँड्समध्ये जगप्रसिद्ध Aalsmeer Flower Market येथे आंतरराष्ट्रीय फुल बाजारपेठ, लिलाव प्रणाली व लॉजिस्टिक्स व्यवस्थापनाचा अभ्यास तसेच अत्याधुनिक हरितगृह प्रकल्प, हवामान नियंत्रण प्रणाली व जलव्यवस्थापन तंत्रज्ञानाची माहिती मिळणार आहे.

या दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसोबतच मूल्यवर्धन, निर्यात संधी, शाश्वत शेती मॉडेल्स व शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी (FPO) उपयुक्त सहकारी रचना समजून घेण्यास मदत होणार आहे. अभ्यास दौऱ्यातील अनुभवांच्या आधारे सहभागी शेतकरी आपल्या जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनाही मार्गदर्शन करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

माननीय कृषिमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत चालू वर्षापासून या योजनेअंतर्गत देण्यात येणारे अनुदान एक लाख रुपयांवरून वाढवून दोन लाख रुपये केले आहे.

या निर्णयामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना परदेशातील प्रगत कृषी तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शासनाच्या या सकारात्मक पावलामुळे राज्यातील शेती क्षेत्राला जागतिक दृष्टीकोन प्राप्त होऊन उत्पादनक्षमता व उत्पन्नवाढीस चालना मिळेल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.